केरूजी भिवाजी घुले आत्मचरित्र पुस्तक प्रकाशन आणि चंदन मसालेच्या नूतन वास्तू उद्घाटन सोहळा निमित्ताने अभिनंदन
विशेष पुरवणी पान 4,5,6 वर



दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढयान् पिढयांचा
काजळे ज्वेलर्स
9601222777
9615222777
सोने
चांदी
हिरे
नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २२३ । किंमत - ४ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) | रविवार १३ /०९/२०२६ । पाने - ८




दत्तमंदिर स्टॉप नाशिक रोड.
7774084019

वाजे पेट्रोल पंप समोर, सिन्नर
8983275498

यशोधन कार्यालया समोर, संगमनेर
9156009908

# संपादकीय...

## स्पर्धा परीक्षांच्या गर्दीत कौशल्य शिक्षण हरवू नये

आज महाराष्ट्रातील लाखो तरुणांच्या डोळ्यांत सरकारी नोकरीचे स्वप्न आहे. स्थिर उत्पन्न, सामाजिक प्रतिष्ठा, नोकरीची सुरक्षितता आणि भविष्यातील स्थैर्य या कारणांमुळे स्पर्धा परीक्षांकडे तरुणांचा मोठा ओढा निर्माण झाला आहे. गावागावांत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रे सुरू झाली आहेत, शहरांमध्ये अभ्यासिकांची संख्या वाढली आहे आणि हजारो विद्यार्थी वर्षानुवर्षे परीक्षा देत आहेत. सरकारी नोकरी मिळविण्याचे स्वप्न चुकीचे नाही; मात्र या स्वप्नाच्या मागे धावताना कौशल्य शिक्षण, व्यावसायिक प्रशिक्षण आणि रोजगारक्षमतेचा मूलभूत मुद्दा दुर्लक्षित होत असेल, तर ही चिंतेची बाब आहे. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला सरकारी नोकरी मिळेलच असे नाही. उपलब्ध पदांची संख्या मर्यादित असते, तर अर्ज करणाऱ्यांची संख्या प्रचंड असते. एका पदासाठी शेकडो, हजारो उमेदवार स्पर्धेत असतात. त्यामुळे अनेक तरुण दोन-तीन वर्षेच नव्हे तर त्याहून अधिक काळ एकाच परीक्षेच्या तयारीत घालवतात. परीक्षा पुढे ढकलली, निकाल रखडला किंवा अपेक्षित यश मिळाले नाही, तर त्यांच्या हातात पर्यायी कौशल्य किंवा रोजगाराचा ठोस मार्ग नसतो. ही परिस्थिती बदलण्याची गरज आहे. खरे तर शिक्षणाचा अंतिम उद्देश केवळ पदवी मिळविणे किंवा सरकारी नोकरी मिळविणे एवढाच नसावा. शिक्षणाने व्यक्तीला स्वतःच्या पायावर उभे राहण्याची क्षमता दिली पाहिजे. बदलत्या अर्थव्यवस्थेत तांत्रिक कौशल्य, डिजिटल ज्ञान, संवादकौशल्य, व्यवस्थापन, विक्री, संगणक, कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा विश्लेषण, इलेक्ट्रॉनिक्स, ऑटोमोबाईल, सौरऊर्जा, ड्रोन तंत्रज्ञान, कृषी प्रक्रिया अशा असंख्य क्षेत्रांत रोजगाराच्या संधी निर्माण होत आहेत. या संधींचा लाभ घेण्यासाठी पारंपरिक पदवीपेक्षा प्रत्यक्ष कामाचे कौशल्य अनेकदा अधिक महत्त्वाचे ठरते. विशेषतः ग्रामीण भागातील तरुणांसाठी कौशल्य शिक्षण हा रोजगाराचा मोठा आधार ठरू शकतो. शेतीशी संबंधित प्रक्रिया उद्योग, दुग्धव्यवसाय, अन्नप्रक्रिया, यंत्रसामग्री दुरुस्ती, इलेक्ट्रिकल कामे, सोलार तंत्रज्ञान, संगणक सेवा, मोबाईल दुरुस्ती, डिजिटल मार्केटिंग, पर्यटन, लॉजिस्टिक्स अशा अनेक क्षेत्रांत स्थानिक पातळीवर रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. मात्र त्यासाठी आवश्यक प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि बाजारपेठेशी जोडणी निर्माण करणे गरजेचे आहे. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे कौशल्य शिक्षणाकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन. आजही अनेक कुटुंबांमध्ये 'सरकारी नोकरी म्हणजेच यश' अशी मानसिकता आहे. हाताने काम करणारा, तांत्रिक व्यवसाय करणारा किंवा स्वतःचा छोटा उद्योग उभा करणारा तरुण काही वेळा कमी दर्जाचा समजला जातो. ही मानसिकता बदलणे आवश्यक आहे. एखादा कुशल इलेक्ट्रिशियन, वेल्डर, मशीन ऑपरेटर, टेक्निशियन, प्लंबर, सॉफ्टवेअर तंत्रज्ञ किंवा उद्योजक आपल्या कौशल्याच्या जोरावर चांगले उत्पन्न मिळवत असेल, तर त्याचे यश सरकारी नोकरीपेक्षा कमी कसे असू शकते? आज उद्योगविश्वालाही केवळ पदवीधारक नव्हे, तर कामासाठी तयार असलेले कुशल मनुष्यबळ हवे आहे. अनेक उद्योगांना प्रशिक्षित कामगार मिळत नाहीत, तर दुसरीकडे रोजगाराच्या शोधात असलेले तरुण मोठ्या संख्येने आहेत. या विसंगतीकडे गांभीर्याने पाहण्याची वेळ आली आहे. शिक्षणसंस्था, औद्योगिक संस्था आणि कौशल्य विकास यंत्रणा यांच्यात अधिक प्रभावी समन्वय निर्माण झाला पाहिजे. विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाबरोबरच प्रत्यक्ष उद्योगातील अनुभव, इंटर्नशिप आणि प्रशिक्षण मिळाले तर रोजगाराची शक्यता निश्चितच वाढेल. शाळेपासूनच विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडी आणि क्षमतेनुसार विविध कौशल्यांची ओळख करून देणे आवश्यक आहे. प्रत्येक विद्यार्थी डॉक्टर, अभियंता किंवा सरकारी अधिकारी होईलच असे नाही. प्रत्येकाची बुद्धिमत्ता, आवड आणि क्षमता वेगळी असते. कोणाला तंत्रज्ञानात रस असेल, कोणाला कला-कौशल्यात, कोणाला व्यवसायात तर कोणाला शेतीत. शिक्षण व्यवस्थेने या विविधतेला स्वीकारून विद्यार्थ्यांना अनेक पर्याय उपलब्ध करून दिले पाहिजेत. याचा अर्थ स्पर्धा परीक्षांना विरोध करणे अजिबात नाही. सरकारी सेवेत जाण्याची इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांनी नक्कीच तयारी करावी. मात्र त्याचबरोबर 'प्लॅन बी' नव्हे तर 'पर्यायी कौशल्य' आपल्या हातात असणे आवश्यक आहे. स्पर्धा परीक्षेची तयारी करत असतानाच एखादे तांत्रिक, डिजिटल किंवा व्यावसायिक कौशल्य आत्मसात करता येते. यामुळे अपयश आले तरी आयुष्य थांबत नाही आणि यश मिळाले तर अतिरिक्त कौशल्य भविष्यातही उपयोगी ठरते. सरकारनेही कौशल्य विकासाच्या योजना केवळ कागदावर न ठेवता त्यांचा रोजगाराशी थेट संबंध जोडला पाहिजे. प्रशिक्षण केंद्रांची गुणवत्ता, प्रशिक्षकांची क्षमता, उद्योगांशी भागीदारी आणि प्रशिक्षणानंतर रोजगार किंवा स्वयंरोजगाराची उपलब्धता यावर भर दिला पाहिजे. गावपातळीवरही कौशल्य प्रशिक्षण केंद्रे आणि स्थानिक उद्योगांच्या गरजेनुसार अभ्यासक्रम उपलब्ध झाले तर ग्रामीण तरुणांचे स्थलांतर कमी होण्यास मदत होईल.

|| जनसेवा हिच ईश्वर सेवा ||

**संगमनेर नगरपरिषद, संगमनेर**

दुरध्वनी:- (02425-225308/225165),
ईमेल-cosangamner@gmail.com

जा.क्रं. संनपा/बांध/R/892/2026 दिनांक – ११/०९/२०२६

### जाहीर सुचना

### सार्वजनिक गणेशोत्सव २०२६ भाविकांसाठी शौचालय व्यवस्था

सर्व भाविक व नागरिकांना कळविण्यात येते की, संगमनेर नगरपरिषद हद्दीत सार्वजनिक गणेशोत्सव २०२६ मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. विविध गणेश मंडळांनी साकारलेले आकर्षक देखावे व आरास पाहण्यासाठी गावठाण भागात व शहरातील प्रमुख ठिकाणी भाविकांची मोठी गर्दी होत असते. भाविकांच्या सोयीसाठी संगमनेर नगरपरिषदेमार्फत शहरात विविध ठिकाणी सार्वजनिक शौचालये व ई-टॉयलेट उपलब्ध करून देण्यात आली आहेत. त्यापैकी गावठाण भागातील व गर्दीच्या ठिकाणांवरील सुविधांची यादी खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | ठिकाण | सुविधा |
|---|---|---|
| १ | जय हिंद सर्कल, मालदाड रोड | ई–टॉयलेट (२) |
| २ | गणेश नगर भाजी मार्केट | ई–टॉयलेट |
| ३ | राजमाता जिजाऊ शाळेजवळ, जनता नगर (मार्केट यार्डच्या पाठीमागे) | सार्वजनिक शौचालय |
| ४ | सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात क्रीडा संकुल– मुख्य प्रवेशद्वाराशेजारी (नेहरू गार्डनशेजारी) | सार्वजनिक शौचालय |
| ५ | संगमनेर नगरपरिषद कार्यालय प्रांगण | शौचालय |
| ६ | बाजारपेठ, अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक नगरपरिषद कार्यालयासमोर | ई–टॉयलेट |
| ७ | लालाजी चौक | ई–टॉयलेट |
| ८ | नेहरू चौक | सार्वजनिक शौचालय |
| ९ | परदेशपुरा – माधव टॉकीजसमोर, पुनर्वसन कॉलनीशेजारी | सार्वजनिक शौचालय |
| १० | केशव तीर्थ घाट (गंगामाई घाट परिसर) | ई–टॉयलेट (२) |
| ११ | गंगामाई माता मंदिर परिसर, गंगामाई घाट | सार्वजनिक शौचालय |

**भाविकांना नम्र विनंती :**

१. गणेशोत्सव कालावधीत भाविकांनी वरील सार्वजनिक शौचालये व ई-टॉयलेटचा वापर करावा; उघड्यावर लघुशंका किंवा शौचास जाऊ नये. या व्यतिरिक्त आवश्यकतेनुसार नगरपरिषदेमार्फत फिरते शौचालय उपलब्ध करून देण्यात येईल.
२. शौचालयाच्या वापरानंतर पाणी टाकून स्वच्छता राखावी. ई-टॉयलेटचा वापर करताना तेथे दिलेल्या सूचनांचे पालन करावे.
३. शौचालयात प्लास्टिक पिशव्या, बाटल्या किंवा इतर कचरा टाकू नये; परिसरात धुंकू नये.
४. ही सुविधा सार्वजनिक मालमत्ता असून तिचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी.
५. शौचालयाबाबत काही अडचण आढळल्यास नगरपरिषदेच्या आरोग्य विभागास कळवावे.

सर्व भाविक व नागरिकांनी नगरपरिषदेने उपलब्ध करून दिलेल्या शौचालय सुविधांचा वापर करून शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी सहकार्य करावे, असे नम्र आवाहन संगमनेर नगरपरिषदेच्या वतीने करण्यात येत आहे.

**सर्व भाविकांना सार्वजनिक गणेशोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा !**

(दयानंद गोरे)
मुख्याधिकारी
संगमनेर नगरपरिषद, संगमनेर

(डॉ. मैथिली तांबे)
नगराध्यक्ष
संगमनेर नगरपरिषद, संगमनेर

# अभियंत्याला घातला २१ लाखांचा गंडा

युवावार्ता (प्रतिनिधी)

राहुरी - शेअर मार्केटमध्ये ट्रेडिंगसाठी पैसे गुंतवल्यास भरघोस परतावा मिळवून देतो, असे सांगून गावातील लॉन्ड्रीवाल्याने एका अभियंत्याला तब्बल २१ लाखांचा गंडा घातल्याचा प्रकार तालुक्यात घडला आहे. संजय चव्हाण (वय ३०, रा. आदित्य हौसिंग सोसायटी, राहुरी फॅक्टरी) असे फसवणूक झालेल्या अभियंत्याचे नाव असून, या प्रकरणी संतोष विनायक भोसले (रा. चिंचविहीरे, ता. राहुरी) याच्याविरुद्ध राहुरी पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी अजिंक्य चव्हाण यांची २०२३ मध्ये डॉ. हर्षद चोरडिया यांच्या माध्यमातून आरोपींशी ओळख झाली होती. आरोपीचे राहुरी फॅक्टरी येथे ड्रायक्लीनिंगचे दुकान असून, तो शेअर मार्केट ट्रेडिंगचे प्रशिक्षण देतो, अशी माहिती चव्हाण यांना देण्यात आली होती. तसेच, त्याच्याकडे ट्रेडिंगसाठी पैसे दिल्यास दरमहा पाच टक्के परतावा मिळतो, असेही सांगण्यात आले. आरोपीवर विश्वास ठेवत फिर्यादीने विविध फायनान्स कंपन्यांकडून कर्ज घेऊन वेळोवेळी आरोपीच्या बँक खात्यावर २१ लाख ३ हजार रुपये जमा केले. त्यानंतर फिर्यादी १ फेब्रुवारी २०२४ रोजी तो पसार झाल्याचे फिर्यादीच्या निदर्शनास आले.


**WASAN TOYOTA** Sangamner

**WE ARE HIRING**

| POST NAME | EXPERIENCE | QUALIFICATION & SKILLS | VACANCY |
|---|---|---|---|
| TEAM LEADER | 3-4 Years | Graduate • Sales Team Handling • Computer • Reporting | 1 |
| SALES OFFICER | 1-2 Years | Graduate • Sales • Computer | 4 |
| OFFICE BOY | Fresher | 10th Pass • Hardworking • Punctual | 1 |

★ Attractive Salary + Good Incentives ★

Walk-in 15 September 2026

Contact 9881 2404 56 | Email hr@wasantoyota.com | Address Panchayat Samiti Jawal, Sangamner Nagar Road, Sangamner

**आकर्षक पगारावर जागा भरणे आहे**
सुपरवायझर
पूर्णवेळ [पुरुष] : ०२ पदे
शैक्षणिक पात्रता: १२वी / आयटीआय उत्तीर्ण
(स्वतःची टु व्हिलर असणे अवश्यक)
ऑफिस असिस्टंट
अर्धवेळ [पुरुष / महिला]
शैक्षणिक पात्रता: १०वी / १२वी उत्तीर्ण
- संपर्क -
उमंग इन्फ्राटेक
7875455777

**पाहिजेत**
कॉम्प्युटर ऑपरेटर - ४
अकाऊंटंट - २
सेल्समन - ५
(इन्सेंटीव्ह दिला जाईल)
आकर्षक पगार दिले जाईल
9822097904
9404971697
भेटण्याची वेळ (सायं ४ ते ७)


**जाहीर नोटीस**

संगमनेर सहकारी औद्योगिक वसाहत मर्या. संगमनेर ता. संगमनेर जि. अहिल्यानगर या सहकारी संस्थेच्या सर्व संचालकाना/सभासदाना सुचित करण्यांत येते की, संस्थेच्या संचालक मंडळातील सर्वसाधारण कारखानदार मतदार संघ प्रतिनिधीची १ जागा व महिला प्रवर्गातील/मतदारसंघातील १ जागा असे एकुन २ संचालकांच्या निवडीकरीता मा. तालुका सहकारी निवडणुक अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, संगमनेर यांचेकडील दिनांक १०/९/२०२६ रोजीच्या आदेशान्वये श्री. राजेंद्र सहादु वाकचौरे, सहकार अधिकारी श्रेणी-१ संगमनेर, अध्यासी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली वार शुक्रवार दिनांक १८/०९/२०२६ रोजी सकाळी ११.०० संस्थेचे कार्यालय, संगमनेर या ठिकाणी संचालक मंडळ सभेचे आयोजन करण्यांत आलेले आहे. सर्व संचालकांनी संचालक मंडळाच्या सभेस हजर राहण्याबाबत आवाहन करण्यांत येत असुन नैमित्तिकपणे रिक्त झालेले दोन पद निवडीसाठी निवडणुक कार्यक्रमानुसार कामकाज करण्यांत येणार आहे, यांची नोंद घ्यावी. तसेच त्यांने सदर पदासाठी आवश्यक ती पात्रता धारण केलेली असावी.

दिनांक – १०/०९/२०२६
ठिकाण – संगमनेर

प्र. मॅनेजर
संगमनेर सहकारी औद्योगगक वसाहत मर्या. संगमनेर
ता.संगमनेर जि. अहिल्यानगर


**पाहिजेत**
रिषभ गोल्ड अ‍ॅण्ड डायमंड
सल्समन - २
ड्रायव्हर - १
वॉचमेन - १
ठिकाण - मेनरोड, साईनाथ चौक, संगमनेर
9604334777
8669888777

**पाहिजेत**
अकाऊंटस् व ऑडिटच्या कामासाठी हुशार व होतकरू मुले पाहिजेत
जितेंद्र लाहोटी (चार्टर्ड अकाऊंटंट)
मेनरोड, काळभैरवनाथ मंदिरा शेजारी, संगमनेर
9822523424

**पाहिजेत**
पेट्रोल पंपावर कामासाठी मुले पाहिजेत
पत्ता – तीन बत्ती चौक, दिल्ली नाका, संगमनेर
9860989807
9422225947

**फ्लॅट विकणे आहे**
- ठिकाण-
दिघी, पुणे, आळंदी रोड, पर्पल ब्लुम सोसायटी, साई पार्क रोड, प्लॉट नं. सी-108
क्षेत्रफळ - 585, फुली फर्निचर, 1 बीएचके 80 स्क्वे फुट बाल्कणी
किचन ट्रॉली, बेड, सोफा, टिव्ही युनिट
8379064040
9960984718

**पाहिजेत**
अमृता चहासाठी
सेल्समन प्रमोटर
(२ जागा, महिला)
पगार - १००००
(बेसिक + इंसेन्टीव्ह)
संपर्क- एस. आर. सेल्समन कार्पोरेशन (मार्केट यार्ड, संगमनेर)
7030501936
9904839193

**पाहिजेत**
ऑफिस बॉय (प्युन)
शिक्षणास प्राधान्य
कॉम्प्युटर ज्ञान,
स्वतःचे वाहन आवश्यक
- संपर्क -
8378956909
8459199913
बायोडाटा पाठवा

**पाहिजेत**
मेडिकल दुकानासाठी महिला व मुले पाहिजे
प्रभात मेडिकल
नवीन नगर रोड, ताजने मळी, संगमनेर
- संपर्क -
9921245753

**जागा विकणे आहे**
अतिशय उत्तम लोकेशन मधील मालदाड रोड, स्टेट बँक कॉलनी लगतची तहसील N. A. व सरकारी मोजीणी झालेली २ गुंठे उत्तरमुखी रहिवाशी चौरस जागा विकणे आहे.
एजंट स्वागत
- संपर्क -
9890468212

**पाहिजेत**
सेल्समन
(महिला/ युवती प्राधान्य)
लिरा द कॉस्मेटिक्स झोन
वृंदावन अपार्टमेंट, गणेश नगर
मो. 7499630747

**भाड्याने देणे आहे**
सर्व सुविधायुक्त ०१ बीएचके रो - हाऊस भाड्याने देणे आहे
सुकेवाडी रोड, संगमनेर
8282825818

**SR THORAT** | **JOB** | **GAGANGIRI**

| Sr. No. | Post | QTY | Qualification and Experience |
|---|---|---|---|
| 1 | Security Guard | 5 | Experience Minimum 5 Year (Ex-Servicemen preferred) |
| 2 | Fitter/Welder/ Mechanical/ Electrical/ Refrigeration | 5 | ITI,DME or any Graduate, Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |
| 3 | Data Operator/ Supervisor | 5 | Any Graduate, Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |
| 4 | Chemist | 5 | B.Sc. Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |

Office Address-S.R.Thorat Milk Products Pvt.Ltd, Rajapur Road,Sangamner, Dist- Ahilyanagar
Mobile Number – 9860100936/937
Sent the CV Following E-Mail Id:
admin@srthoratmilk.com / hr@srthoratmilk.com




**पाहिजेत**
सोनोग्राफी सेंटरसाठी मुलगी पाहिजे
कॉम्प्युटर व इंग्रजी टायपिंग येणे आवश्यक
(२ जागा त्वरीत भरणे आहे)
कामाची वेळ दु. १२ ते ८
संपर्क– जाधव सोनोग्राफी सेंटर मर्चंट बँकेसमोर, नविन नगर रोड, संगमनेर
9307188862

**पाहिजेत**
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
पार्ट टाइम /फुल टाइम काम मिळेल ( सेक्युरिटी गार्ड
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

**नोकरीची सुवर्णसंधी**
श्री गणेश टायर्स
अकाऊंटंट - १
टॅली, जीएसटी ज्ञानास प्राधान्य
सेल्स एक्झीक्युटिव्ह - १
बॅटरी व इंजिन ऑईलच्या विक्री क्षेत्रातील अनुभव
अनुभावानुसार आकर्षक पगार
पत्ता - तीन बत्ती चौक, संगमनेर
८९९९८६२७५९

**पाहिजेत**
जानकीराम गंगाधर काजळे ज्वेलर्ससाठी
सेल्स एक्झीक्युटिव्ह -४
मार्केटिंग एक्झीक्युटिव्ह -४
हेल्पर - २
मेन रोड, संगमनेर
7588249849




# गणरायाच्या आगमनाची संगमनेरमध्ये जय्यत तयारी

## मंडळांची लगबग वाढली; पोलिस-प्रशासन सज्ज, भक्तांची उत्सुकता शिगेला

### प्रवरा कोरडीच, नदीला पाणी सोडण्याच्या मागणीवरून श्रेयवाद



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - विघ्नहर्ता श्री गणरायाच्या आगमनाची चाहूल लागताच संगमनेर शहरातील वातावरण भक्तिमय झाले असून, सोमवार, दि. १४ सप्टेंबर रोजी होणाऱ्या गणेश चतुर्थीच्या स्वागतासाठी सार्वजनिक गणेश मंडळांसह घरगुती उत्सव करणारे व या सर्वांच्या सोयीसाठी प्रशासनही सज्ज झाले आहे. आकर्षक सजावट, विद्युत रोषणाई, देखावे आणि गणेशमूर्तींच्या आगमनाची तयारी सर्वत्र जोरदार सुरू आहे. यंदाच्या गणेशोत्सवात प्रवरा नदीपात्रातील पाण्याचा अभाव हा चर्चेचा आणि राजकीयदृष्ट्या संवेदनशील मुद्दा ठरत आहे.

शहरातील विविध गणेश मंडळांनी मंडप उभारणी, विद्युत रोषणाई, आकर्षक देखावे आणि ध्वनिव्यवस्थेची तयारी सुरू केली आहे. गणरायाच्या आगमन मिरवणुकीसाठीही मंडळांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, कार्यकर्त्यांची धावपळ वाढली आहे. अनेक मंडळांकडून सामाजिक, धार्मिक आणि जनजागृतीपर उपक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे. घरगुती गणेशोत्सवासाठीही नागरिकांनी मोठ्या उत्साहात तयारी केली असून, बाजारपेठेत गणेशमूर्ती, सजावटीचे साहित्य, फुले, हार तसेच पूजेच्या साहित्याच्या खरेदीसाठी गर्दी वाढू लागली आहे.

दरम्यान, गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिस यंत्रणेकडूनही नियोजन करण्यात येत आहे. संवेदनशील ठिकाणांवर बंदोबस्त, मिरवणूक मार्गावरील वाहतूक नियोजन, गर्दीवर नियंत्रण, सीसीटीव्हीच्या माध्यमातून देखरेख तसेच अनुचित प्रकारांना आळा घालण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर भर दिला जात आहे. नगरपरिषद, वीज वितरण कंपनी, अग्निशमन विभाग आणि अन्य संबंधित यंत्रणांकडूनही गणेशोत्सवाच्या अनुषंगाने आवश्यक तयारी केली जात आहे.

**प्रवरा कोरडी; गणेशोत्सवात पाण्याचा प्रश्न ऐरणीवर**

एकीकडे गणरायाच्या आगमनाचा उत्साह शिगेला पोहोचला असताना दुसरीकडे संगमनेरची जीवनवाहिनी असलेल्या प्रवरा नदीपात्रात सध्या पाणी नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. गणेशोत्सवाच्या काळात नदीकाठ परिसरात मोठ्या प्रमाणावर भाविकांची वर्दळ असते. गणेश विसर्जनासाठीही नदीपात्राला महत्त्व असल्याने प्रवरा नदीत पाणी सोडण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

नदीत पाणी सोडण्याच्या मागणीसाठी विविध राजकीय पक्ष, लोकप्रतिनिधी आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून पाठपुरावा सुरू झाला आहे. मात्र, पाणी सोडण्याच्या मागणीपेक्षा त्याचे श्रेय कोण घेणार, यावरच राजकारण रंगण्याची चिन्हे दिसत आहेत. संबंधित यंत्रणांकडे मागण्या, निवेदने आणि पाठपुरावा सुरू असताना 'पाणी आम्ही आणले' या श्रेयासाठी राजकीय हालचालींना वेग आला आहे. त्यामुळे गणरायाच्या आगमनापूर्वीच प्रवरेच्या पाण्यावरून राजकीय वातावरण तापण्याची शक्यता आहे.

**भक्तांची प्रतीक्षा; गणरायाच्या स्वागतासाठी शहर सज्ज**गणेश चतुर्थीला अवघे दोन दिवस उरल्याने संगमनेरकरांची गणरायाच्या आगमनाची प्रतीक्षा आता शिगेला पोहोचली आहे. 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात विघ्नहर्त्याचे स्वागत करण्यासाठी मंडळांचे कार्यकर्ते सज्ज झाले आहेत. उत्सव शांततेत, उत्साहात आणि सामाजिक सलोखा राखत पार पडावा, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

गणरायाच्या आगमनापासून विसर्जनापर्यंतचा उत्सव निर्विघ्न पार पाडण्याची जबाबदारी प्रशासन आणि मंडळांवर असली, तरी उत्सवाच्या उत्साहाला प्रवरेच्या पाण्याची साथ मिळणार का? आणि मिळाल्यास त्याचे श्रेय नेमके कोण घेणार? याकडे आता संगमनेरकरांचे लक्ष लागले आहे.

### उत्सवाचा आनंद घ्या पण इतरांना त्रास नको

**गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील विविध रस्त्यांवर व गल्ली-बोळांत गणेश मंडप उभारण्यात आले आहेत. गणरायाच्या उत्सवाचा आनंद सर्वांनी घ्यावा; मात्र मंडप उभारताना वाहतूक, पादचारी तसेच आपत्कालीन सेवांच्या मार्गाचा विचार करून नियोजन करावे, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची नगरपालिकेत मुख्याधिकारी व नगराध्यक्षा डॉ. मैथिली तांबे यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली होती. या बैठकीत नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी विविध सूचना करण्यात आल्या होत्या. त्यामुळे प्रशासनाने अतिक्रमण विभाग व अभियंत्यांमार्फत शहरातील मंडपांची प्रत्यक्ष पाहणी करून वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या ठिकाणी आवश्यक सूचना द्याव्यात, अशी मागणी होत आहे. पोलीस प्रशासनानेही वाहतूक व्यवस्था, नागरिकांची सुरक्षितता आणि आपत्कालीन वाहनांसाठी मार्ग मोकळा राहील याची दक्षता घ्यावी. तसेच गणेश मंडळांनी प्रशासनाला सहकार्य करून उत्सवाचा उत्साह कायम ठेवतानाच नागरिकांची गैरसोय टाळावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. गणरायाचा उत्सव लोकांना जोडण्यासाठी आहे; त्यामुळे श्रद्धेसोबत शिस्त, नियोजन आणि नागरिकांची सोयही जपली जावी.**

## पुणे-नाशिक रेल्वे मार्ग सरळ होणे सर्वांच्याच हिताचे - माजी मंत्री थोरात

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - मुंबई-नाशिक-पुणे हा महाराष्ट्राच्या विकासाचा 'गोल्डन ट्रँगल' असून, या तिन्ही महत्त्वाच्या शहरांना थेट जोडणारा नाशिक-पुणे सरळ रेल्वे मार्ग हा केवळ वाहतुकीचा प्रकल्प नसून उत्तर महाराष्ट्र आणि पुणे जिल्ह्याच्या भविष्यातील विकासाची गरज आहे. या रेल्वेसाठी सातत्याने पाठपुरावा करून भूसंपादनासह अनेक कामे पूर्ण झाली आहेत. शेतकऱ्यांना भूसंपादनापोटी ५०० कोटी रुपयांपेक्षा अधिक मोबदला देण्यात आला असताना आता विविध कारणे पुढे करून हा मार्ग रद्द करण्याची भूमिका अत्यंत दुर्दैवी आहे, अशी प्रतिक्रिया




काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी महसूल व कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केली.

केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी नाशिक-पुणे सरळ रेल्वे मार्ग रद्द केल्याचे विधान केल्यानंतर उत्तर महाराष्ट्रासह पुणे जिल्ह्याच्या उत्तर भागात तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर थोरात यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, मुंबई-नाशिक-पुणे हा 'गोल्डन ट्रँगल' विकासाच्या दृष्टीने महाराष्ट्रासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. या भागातील उद्योग, व्यापार, शिक्षण, पर्यटन आणि रोजगाराला चालना देण्यासाठी नाशिक-पुणे रेल्वेची थेट जोडणी आवश्यक आहे. या प्रकल्पासाठी आपण सातत्याने पाठपुरावा केला. त्यानुसार भूसंपादन झाले असून शेतकऱ्यांना ५०० कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कम देण्यात आली आहे. प्रकल्पाच्या दृष्टीने एवढी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर आता जीएमआरटीसह अन्य कारणे पुढे करून रेल्वे मार्ग रद्द केला जात असल्याचे सांगितले जाणे दुर्दैवी आहे. नवीन मार्ग सुचविण्यात आला आहे; मात्र त्या मार्गामुळे नेमकी काय उपलब्धी होणार, कोणता विकासात्मक फायदा होणार, याचे समाधानकारक उत्तर मिळत नाही. त्यामुळे नाशिक-पुणे रेल्वे सरळ मार्गानेच झाली पाहिजे, यासाठी सर्वांनी एकजुटीने आग्रह धरला पाहिजे, असेही थोरात यांनी स्पष्ट केले. हा प्रश्न कोणत्याही एका पक्षाचा किंवा व्यक्तीचा नसून भावी पिढ्यांच्या विकासाशी संबंधित आहे. (पान ८)

## अहिल्यानगरमध्ये FDAचा 'बटर'वर मोठा दणका

### ७५ हजार किलो संशयास्पद बटर जप्त; तब्बल ३.९५ कोटींचा साठा ताब्यात

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर : आगामी सणासुदीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या संशयास्पद अन्नपदार्थांविरोधात अन्न व औषध प्रशासनाने (ऋऊ-) मोठी धडक कारवाई केली आहे. अहिल्यानगर एमआयडीसी परिसरातील एका शीतगृहावर छापा टाकून तब्बल ७५ हजार ३५६ किलो वजनाचे, अंदाजे ३ कोटी ९५ लाख ६२ हजार ३२० रुपये किमतीचे संशयास्पद बटर जप्त करण्यात आले आहे. सणांच्या तोंडावर झालेल्या या कारवाईमुळे अन्न व्यावसायिकांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

एमआयडीसी परिसरातील 'अरिहंत कोल्ड स्टोरेज' येथे गुरुवारी रात्री सुमारे ८ वाजता अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने धाड टाकली. सुरू झालेली ही कारवाई शुक्रवारी सकाळपर्यंत सुरू होती. या कारवाईत मोठ्या प्रमाणात पाश्चराईज्ड कुकिंग (अनसोल्टेड) बटरचा साठा आढळून आला. सदर बटर कमी दर्जाचे असल्याचा संशय असून, त्यावर मुदत संपण्याच्या तारखेचा उल्लेख नसल्याने लेबल वर्णनाच्या नियमांचे उल्लंघन झाल्याचे प्राथमिक तपासणीत समोर आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यातील पाटस येथील 'मधुरमा क्रिमी डिलाईट' या कंपनीने या बटरची निर्मिती केली होती. निर्मितीनंतर हा मोठ्या प्रमाणातील साठा अहिल्यानगर एमआयडीसीतील अरिहंत कोल्ड स्टोरेजमध्ये ठेवण्यात आला होता.

प्राथमिक माहितीनुसार हा अन्नपदार्थाचा साठा 'पतंजली फूड लिमिटेड'शी संबंधित असल्याचे अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त गौरव जगताप यांनी स्पष्ट केले आहे. या शीतगृहातून सदर बटर संपूर्ण महाराष्ट्रात वितरित केले




जाण्याची शक्यता असून, त्या अनुषंगाने प्रशासनाने तपास सुरू केला आहे.

कारवाईदरम्यान अन्नसुरक्षा अधिकाऱ्यांनी बटरचे नमुने ताब्यात घेऊन ते शासकीय प्रयोगशाळेत विश्लेषणासाठी पाठविले आहेत. बटरचा दर्जा, सुरक्षितता आणि नियमांचे पालन याबाबतचा प्रयोगशाळा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कायदेशीर कारवाई निश्चित केली जाणार आहे. ही कारवाई अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या आदेशानुसार आणि सहआयुक्त एम. यू. माने (नाशिक) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. अन्नसुरक्षा अधिकारी राजेश बडे, पी. पी. पवार, किरण जगदाळे आणि प्रसाद कसबेकर यांच्या पथकाने ही कारवाई केली.

सणासुदीच्या काळात मिठाई, दुग्धजन्य पदार्थ आणि इतर खाद्यपदार्थांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढते. या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या आरोग्याशी तडजोड करणाऱ्या कमी दर्जाच्या अथवा भेसळयुक्त अन्नपदार्थांची विक्री रोखण्यासाठी प्रशासनाने तपासणी मोहीम अधिक तीव्र केली आहे. या कारवाईला अन्नसुरक्षा विभागाची आजवरची मोठी कारवाई मानले जात आहे.

दरम्यान, शहरातील व्यापारी, मिठाई उत्पादक आणि अन्न व्यावसायिकांनी कमी दर्जाचे, भेसळयुक्त अथवा अस्वच्छ ठिकाणी तयार केलेले अन्नपदार्थ विक्रीस ठेवू नयेत, असा सक्त इशारा प्रशासनाने दिला आहे. बाहेरील राज्यातून ट्रॅव्हल्स अथवा अन्य वाहनांमधून अस्वच्छ वातावरणात कमी दर्जाचे अन्नपदार्थ मागविणे किंवा त्यांची वाहतूक करणे आढळल्यास संबंधित व्यावसायिकांसह ट्रॅव्हल्स एजन्सीवरही कडक कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा सहाय्यक आयुक्त गौरव जगताप यांनी दिला आहे.












# चंदन मसाले या नूतन वास्तूच्या विस्तारीत दालनाचा उद्‌घाटन सोहळा आणि केरूजी घुले यांच्या "कृतार्थ मी" या आत्मचरित्र पुस्तक प्रकाशन सोहळा




| 1946 | 1950 | 1960 | 1960 | 1967 | 1970 | 1970 | 1972-75 | 1980 | 1980 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **जन्म**<br>२० सप्टेंबर १९४६<br>सावरगाव घुले,<br>ता. संगमनेर | **प्राथमिक शिक्षण**<br>गावातील शाळा<br>नारायणराव पोखरकर<br>गुरूजींचे संस्कार | **माध्यमिक शिक्षण**<br>सर डी.एम. पेटीट<br>हायस्कूल संगमनेर<br>८ वी ते ११ वी | **उच्च शिक्षण**<br>संगमनेर कॉलेज<br>प्री डिग्री कॉमर्स<br>बी. कॉम. | **श्रध्देची सुरूवात**<br>स्वामी समर्थ<br>सप्तश्रृंगी माता<br>श्रध्दा अधिक दृढ | **विवाह**<br>सौ. प्रमिला यांच्याशी<br>विवाह.<br>संसाराची सुरूवात | **नोकरीचा प्रारंभ**<br>धुळे पशुखाद्य<br>कारखान्यात<br>स्टोअर कीपर | **शासकीय सेवा**<br>कापूस खरेदी योजना<br>प्रथम श्रेणी अधिकारी.<br>धुळे, रावेर येथे | **कर्तव्य/अध्यात्म**<br>भ्रष्टाचार विरोधात<br>आवाज आणि<br>समर्थांची भक्ती | **कुटुंबाचा विस्तार**<br>शेती, कृषी सेवा केंद्र<br>हुंडेकरी व्यवसायात<br>पदार्पण |

| 1988 | 1988-2018 | 1989 | 1996 | 1997 | 2003 | 2018 | 2020 | 2023 | आज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **LIC सेवा**<br>सुमारे ३० वर्षे<br>एलआयसी एजंट<br>म्हणून सेवा | **पालकांचा सन्मान**<br>आई वडिलांना<br>पुणे-मुंबई<br>विमानप्रवासाची भेट | **व्यवसाय विस्तार**<br>टोमॅटो व्यापारातून<br>विविध राज्यांशी<br>संबंध | **'जगदंब' स्थापना**<br>देवीवरील श्रध्देतून<br>जगबंद फुड प्रोडक्ट<br>मसाल उद्योग सुरूवात | **कुटुंबात नवीन साथ**<br>चंदन-वैशाली<br>विवाह. सुनेचीही<br>भक्कम साथ | **वारीचा प्रारंभ**<br>सप्तश्रृंगी आणि<br>स्वामी समर्थ पौर्णिमा<br>वारीला प्रारंभ | **सेवेचा टप्पा**<br>एलआयसी एजंट<br>म्हणून व्यवसायाचा<br>समारोप | **पुढची पिढी**<br>भूषण आणि अक्षदा<br>विवाह आणि<br>व्यवसायात सक्रीय | **माणुसकी**<br>अन्नदान,<br>गरजूंना मदत,<br>साधुंचा पाहुणचार | **चंदन ब्रँड**<br>नवीन वास्तू आणि<br>चंदन मसाल्याचा<br>ब्रँड महाराष्ट्रभर |

# सात्विक विचारांचा दीपस्तंभ : केरूजी भिवाजी घुले



**शैले शैले न माणिक्यं, मौक्तिकं न गजे गजे।**
**साधवो न हि सर्वत्र, चन्दनं न वने वने।।**

वरील संस्कृत सुभाषिताचा अर्थ असा की प्रत्येक पर्वतावर माणिक नावाचे रत्न असे नाही, तसेच प्रत्येक हत्तीच्या गंडस्थळात भौतिक असतेच असे नाही. समाजात सर्वत्र साधू असतात असे नाही आणि प्रत्येक वनात चंदनाचे वृक्ष असतील असेही नाही.

वरील संस्कृत सुभाषित मसाले उद्योगातील उद्योगपती श्री. केरूजी भिवाजी घुले दादा यांना लागू होते. आज ते वयाची ८० वर्ष पूर्ण करीत असताना त्यांच्या जगदंबा फूड प्रॉडक्ट्स या व्यवसायाच्या अतिशय भव्य वास्तूचे अनावरण व चंदन मसाले उद्योगाचे नूतनीकरण होत आहे. या प्रसंगी श्री केरुजी भिवाजी घुले यांनी स्वतःचे आत्मचरित्र 'कृतार्थ मी' या नावाने तयार केले असून त्या आत्मचरित्राचे अनावरणही आज शनिवार दिनांक १२ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी नूतन वास्तूच्या भव्य प्रांगणात होत आहे. श्री केरूजी भिवाजी घुले यांचा आणि माझा स्नेह संबंध किमान ३५ वर्षापासूनच आहे. ते एलआयसी एजंट म्हणून काम करीत असताना घारगाव येथे त्यांचा कृषी सेवा केंद्राचा व्यवसायही होता. श्री केरूजी भिवाजी घुले हे सात्विक स्वभावाचे, करारी विचारांचे, कष्टाने प्रगती करण्याचे आणि सर्वांना सहकार्य करण्याचे विचार असणारे व्यक्तिमत्त्व आहे. त्यांच्या जीवन कार्याचा आढावा घेत असताना समाजाच्या प्रबोधनासाठी. सात्विकतेसाठी आणि प्रगतीसाठी विचार करणारे श्री घुले दादा हे या परिसरातील दीपस्तंभ आहेत. त्यांनी अत्यंत सचोटीने, कष्टाने आणि तंत्रज्ञानाचा आधार घेऊन 'जगदंबा फूड प्रॉडक्ट्स' या नावाने मसाले व्यवसाय अहिल्यानगर, पुणे, नाशिक, ठाणे या जिल्ह्यांमध्ये प्रसिद्ध केला आहे. विस्तारित केला आहे.

श्री केरुजी भिवाजी घुले दादा यांचे मूळ गाव सावरगाव घुले आणि त्यांच्या घराण्याचा इतिहास हा संस्थानिका सारख्या सरदाराचा असला तरी परिस्थितीनुरूप आणि शिक्षणाच्या अभावाने त्यांचा असणारा मोठा वाडा, जमिनी काळाच्या ओघात नष्ट झाले. गरिबी असली तरी विचारांची आणि शिक्षणाची श्रीमंती त्यांच्याकडे होती. त्यांचे वडील भिवाजी घुले हे प्राथमिक शिक्षक असल्याने शिक्षणाचे संस्काराचे प्रामाणिकपणाचे बाळकडू केरूजी दादा यांना वडिलांकडूनच मिळालेले आहे. ५० वर्षांपूर्वी शिक्षणासाठी धडपड करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस प्रचंड संघर्ष करावा लागलेला आहे. तो केरुजी दादांनीही केला. या पठार भागातील माळेगाव येथील प्रभाकरराव भोर हे फार मोठे समाजसेवक होऊन गेले. घुले दादा बी.कॉम. झाल्यानंतर संगमनेर शेतकी संघात क्लार्क म्हणून पहिल्या नोकरीची संधी भोर साहेबांनी दिली. याच भोर साहेबांनी त्यांना कॉटन फेडरेशन, कापूस खरेदी योजना आणि मार्केटिंग फेडरेशनच मध्ये क्लास वन अधिकारी पदापर्यंत नोकरी करण्याची संधी दिली. क्लासवन अधिकारी झाल्यानंतर नोकरी सोडून. केरुजी दादा आपल्या मायभूमीकडे परत आले. व्यवसायाद्वारे सर्व कुटुंब कुटुंबाची प्रगती करण्याची त्यांची इच्छा प्रबळ झाली आणि वयाच्या ५० व्या वर्षी त्यांनी नवीन व्यवसायाचा श्रीगणेशा केला. केरुजी घुले दादा यांचे घराण्यात श्री सप्तशृंगी माता देवीची उपासना आहे आणि त्यामुळेच आपली उत्कृष्ट प्रगती झाली अशी केरुजी दादांची ठाम खात्री आहे. श्री सप्तशृंगी मातेची मनःपूर्वक सेवा करत असताना त्यांनी प्रत्येक पौर्णिमेस सप्तशृंगी गडावर जाऊन प्रदक्षिणा केल्या. जवळच असलेल्या दिंडोरी येथील श्री स्वामी समर्थ केंद्रात सेवा केली आणि श्रद्धापूर्वक आचरणही केले. विचारांची व्यवहाराची सात्विकता ही केरुजी दादांच्या स्वभावाची गुरुकिल्ली आहे आणि हेच संस्कार त्यांनी त्यांचे चिरंजीव चंदन यांना दिले. चंदनही बी.कॉम. झाल्यानंतर या व्यवसायामध्ये कार्यरत होऊन त्यांनी व्यवसायाचा झेंडा सर्वत्र फडकवलेला आहे. त्याची पुढील वाटचाल केरू दादांचे नातू भुषण हे पुढे चालवीत आहेत. श्री केरुजी भिवाजी घुले दादा हे व्यावसायिक क्षेत्रात, धार्मिक क्षेत्रात अत्यंत प्रामाणिकपणे सेवा करीत असताना त्यांनी या जगदंबा मसाले व्यावसायास ग्रामीण भागात अत्यंत कष्टाने प्रतिष्ठा मिळवून दिली. तसेच या खंदरमाळाच्या खडकावर कर्तुत्वाची गुढी उभारली.

**अवघाची संसार सुखाचा करीन आनंदे भरीन तिन्ही लोक**

याप्रमाणे वयाची ८० वर्ष पूर्ण करीत असताना ते अत्यंत समाधानी आहेत. श्री सप्तशृंगी माता आणि श्री स्वामी समर्थ यांची सेवा सर्व परिसरात देत असताना, हा व्यवसाय आणि कुटुंब यांना मार्गदर्शन करीत असताना, समाजाप्रती, ईश्वराप्रती त्यांची कृतज्ञतेची भावना असल्याने त्यांनी आपल्या आत्मचरित्र ग्रंथास कृतार्थ मी असे नाव दिलेले आहे. श्री केरुजी दादा यांच्या स्वभावाचे एक खास वैशिष्ट्य की ते मैत्रीला पक्के आहेत आणि जनसंपर्काची त्यांच्याकडे खास हातोटी आहे. संगमनेर शहरातील अत्यंत प्रसिद्ध असणाऱ्या अनेक व्यक्तींची त्यांचे अत्यंत मैत्रीचे ऋणानुबंध आहेत. श्रमिक उद्योग समूहाचे श्री. साहेबराव नवले, एस आर थोरात उद्योगाचे संभाजीराजे थोरात व त्यांचा परिवार, मालपाणी उद्योग समूहाचे श्री संजय मालपाणी, गिरीश मालपाणी, त्यांचे मार्गदर्शक व प्रसिद्ध चार्टर्ड अकाउंटंट एस. झेड. देशमुख सर, थोरात परिवार, तांबे परिवार आणि आता संगमनेरचे लोकप्रतिनिधी असलेले अमोल खताळ हे त्यांच्या स्नेहात आहेत.

पठार भागात उद्योगाची व्याप्ती वाढवत असताना त्यांनी आपले ऋणानुबंध सर्वत्र जपले आहेत. आपले भाऊ, भाऊबंद, नातेवाईक आणि मित्रमंडळी यांचा फार मोठा गोतावळा त्यांनी सभोवताली निर्माण केला आहे. त्यांनी मिळवलेले धन प्रसंगानुरूप ते धार्मिक कार्यासाठी, सामाजिक कार्यासाठी गरजेनुसार वापरत असताना विचारांचे योगदानही ते या परिसरास मुक्तपणे देत आहेत. आजच्या या कार्यक्रम प्रसंगी त्यांनी या परिसराचे ऋण म्हणून सर्व पै पाहुणे आणि मित्रांचा या उद्योगाचा अत्यंत महत्त्वाचा एक टप्पा म्हणून आजच्या या स्नेह मेळाव्याचे आयोजन करून सर्वांना एकत्रच भेटण्याची संधी निर्माण केली आहे. श्री केरूजी घुले दादा या परिसराचे, त्यांच्या कुटुंबाचे चंदन आहेत. त्यांनी संपूर्ण आयुष्य स्वतःच्या उद्योग उत्कर्षासाठी, कुटुंबाच्या वाटचालीसाठी, समाजाच्या मदतीसाठी चंदनाप्रमाणे झिजवले आणि आज त्यांच्या कार्याचा चंदनी सुगंध सर्वत्र दरवळत आहे. या पुढील काळातही त्यांना अत्यंत समाधानी, आनंददायी, सौख्यदायी आयुष्य लाभो अशा शुभेच्छा व्यक्त करतो.

**- किसन भाऊ हासे,**
**संपादक, दैनिक युवावार्ता संगमनेर**
**संस्थापक, युवा उद्योग समूह, संगमनेर**









# संघर्षातून कर्तृत्वाचा वटवृक्ष उभा करणारा अवलिया

प्रतिकूलतेला न घाबरता प्रामाणिकपणा, कष्ट, श्रद्धा आणि माणुसकीच्या बळावर स्वतःची वाट निर्माण करणाऱ्या केरूजी भिवाजी घुले यांच्या जीवनप्रवासाची एका जिवलग मित्राने अनुभवलेली कहाणी. काही माणसे आपल्या आयुष्यात येतात आणि केवळ ओळखीची व्यक्ती म्हणून राहात नाहीत; त्यांच्या जगण्याकडे पाहताना आपल्यालाच आपल्या आयुष्याचा अर्थ नव्याने समजू लागतो. केरूजी भिवाजी घुले हे माझ्यासाठी असेच एक व्यक्तिमत्त्व. त्यांना जवळून पाहताना मला नेहमी एक गोष्ट जाणवली-परिस्थिती माणसाला घडवते, पण परिस्थितीसमोर न झुकण्याचा निर्णय माणूस स्वतः घेतो. केरूजींनी आयुष्यभर हाच निर्णय घेतला.

सावरगाव घुलेच्या दुष्काळी मातीत २० सप्टेंबर १९४६ रोजी त्यांचा जन्म झाला. घरची परिस्थिती साधी. शेती कोरडवाहू आणि उत्पन्न मर्यादित. वडील शिक्षक; घरात कष्टाची आणि शिस्तीची परंपरा. लहानपणी सुखसोयींची रेलचेल नव्हती, पण संस्कारांची कमतरता नव्हती. आईच्या कष्टातून, भावंडांच्या सहवासातून आणि गावच्या मातीशी असलेल्या नात्यातून केरूजींचा स्वभाव आकार घेत गेला. चार भिंतींच्या सुरक्षित जगापेक्षा जीवनातील वास्तव त्यांनी लहानपणापासून अनुभवले.

प्राथमिक शिक्षण गावात झाले. नारायणराव पोखरकर गुरुजींसारख्या शिक्षकांचे प्रेम आणि शिस्त त्यांच्या मनावर कोरली गेली. पुढे पाचवी ते सातवीचे शिक्षण सारोळे पठार येथे झाले. रोजचा तीन किलोमीटरचा पायी प्रवास, डब्यातील भाकरी-मिरचीचा ठेचा आणि साधेपणाने जगण्याची सवय-या गोष्टी आज ऐकताना छोट्या वाटतील; पण त्या काळात त्या एका ग्रामीण मुलाच्या व्यक्तिमत्त्वाची शाळाच होत्या. सातवी झाल्यानंतर काही काळ गुरे राखत घरी राहावे लागले. आठवीचे शिक्षण पुढे घेण्यासाठी संगमनेरला जाण्याची वेळ आली तेव्हा आर्थिक अडचणी आड आल्या; पण शिक्षण सोडायचे नाही, हा निर्धार अधिक मोठा होता.

सर डी. एम. पेटीट हायस्कूल, संगमनेर आणि त्यानंतर संगमनेर कॉलेजमधील शिक्षणाचा प्रवास त्यांनी मेहनतीने पूर्ण केला. परिस्थितीशी तडजोड केली, पण ध्येयाशी नाही. गरज पडली तेव्हा स्वतः स्वयंपाक केला, साध्या खोलीत राहिले, काटकसरीने दिवस काढले; मात्र शिक्षणाचा धागा हातातून सुटू दिला नाही. त्यांच्या पुढील आयुष्यात दिसणाऱ्या आत्मविश्वासाची बीजे याच काळात पडली असावीत.

केरूजींच्या जीवनात श्रद्धेलाही एक वेगळे स्थान आहे. समशृंगी देवीवरील भक्ती आणि पुढे श्री स्वामी समर्थांवरील दृढ श्रद्धा त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनली. १९६७ पासून त्यांनी मंगळवारचा उपवास सुरू केला. १९८० नंतर स्वामी समर्थ सेवेशी त्यांचे नाते अधिक दृढ झाले आणि पुढे समशृंगी वारी, दिंडोरी येथील स्वामी समर्थ केंद्राला भेटी अशा धार्मिक प्रवासातून त्यांच्या श्रद्धेला आकार मिळत गेला. त्यांच्या तोंडी नेहमी असणारा भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे हा संदेश केवळ धार्मिक वाक्य नव्हता; संकटाच्या क्षणी उभे राहण्याची त्यांची मानसिक ताकदही त्यातून दिसत होती. नोकरीच्या काळात केरूजींच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांत महत्त्वाचा पैलू मला जाणवला तो म्हणजे प्रामाणिकपणा. १९७० पासून त्यांनी नोकरीचा प्रवास सुरू केला. १९७२ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या कापूस एकाधिकार खरेदी योजनेत प्रथम श्रेणी अधिकारी म्हणून काम करण्याची संधी मिळाली. रावेरसह विविध ठिकाणी त्यांनी जबाबदाऱ्या सांभाळल्या.

अचलपूरमधील एक प्रसंग त्यांच्या स्वभावाची खरी ओळख करून देतो. वरिष्ठांकडून अनैतिक आर्थिक व्यवहारात सहभागी होण्यासाठी दबाव आला; पण त्यांनी स्पष्ट नकार दिला. परिणामांची भीती न बाळगता त्यांनी आपली भूमिका कायम ठेवली. पुढे त्याच व्यक्तीने त्यांच्या प्रामाणिकपणाची दखल घेतली, त्यांच्याबद्दल आदर व्यक्त केला. केरूजींच्या आयुष्यात अशा प्रसंगांची किंमत पैशात मोजता येणार नाही; कारण त्यांनी संपत्तीपेक्षा स्वच्छ चारित्र्य जपले. अचलपूरमधीलच एका दुसऱ्या प्रसंगात त्यांचे धाडस दिसून येते. कापूस केंद्रातील कर्मचाऱ्यांकडून जबरदस्तीने पैसे उकळणाऱ्या एका गुन्हेगाराविरुद्ध त्यांनी पोलिसांत तक्रार करण्याचे धैर्य दाखवले. भीतीचे वातावरण असतानाही त्यांनी प्रश्नाला सामोरे जाणे पसंत केले. त्यांच्या स्वभावात हीच एक विशेष गोष्ट होती-संकट टाळण्यापेक्षा ते त्याच्या मुळाशी जाण्यावर विश्वास ठेवत.

१९८८ मध्ये त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला. हा निर्णय केवळ नोकरी सोडण्याचा नव्हता; कुटुंबाच्या व्यवसायाला वेळ देण्यासाठी घेतलेला तो मोठा वळणबिंदू होता. भाऊ गंगाधर यांनी शेती, कृषी सेवा केंद्र आणि हुंडेकरी व्यवसाय उभा केला होता. केरूजींनी आपले भांडवल, अनुभव आणि कष्ट या व्यवसायात लावले. पुढे टोमॅटो व्यापाराच्या निमित्ताने देशाच्या विविध भागांत व्यवहार झाले. एका तरुणाचा विशाखापट्टणम येथे पत्ता लागत नसताना केरूजी स्वतः तिथे गेले, पोलिस ठाणे, रेल्वे स्थानके, रुग्णालये अशा ठिकाणी चौकशी केली आणि त्याचा शोध घेतला. ही घटना त्यांच्या व्यावसायिक जबाबदारीबरोबरच माणुसकीचीही साक्ष देते.

१९८८ ते २०१८ या काळात त्यांनी एलआयसी एजंट म्हणूनही काम केले. लोकांशी संबंध जोडताना विश्वासाला त्यांनी कधीही व्यवहाराचे रूप दिले नाही. विमा व्यवसायात मिळालेल्या यशामागे केवळ विक्री नव्हती; लोकांशी जपलेले नाते आणि सेवा वृत्ती होती. आणि मग आला त्यांच्या आयुष्यातील आणखी एक महत्त्वाचा टप्पा-जगदंबा फूड प्रॉडक्ट्सचा प्रवास. सुमारे १९९६ मध्ये वयाच्या पन्नाशीत त्यांनी मसाला उद्योगाला सुरुवात केली. आयुष्याच्या या टप्प्यावर नव्याने उद्योग सुरू करण्याचे धाडस प्रत्येकाला जमतेच असे नाही. पण केरूजींसाठी वय अडथळा नव्हते. कुटुंबाची साथ, स्वतःचा अनुभव आणि देवीवरील श्रद्धा या तिन्हींच्या बळावर त्यांनी उद्योगाची पायाभरणी केली. 'जगदंबा' हे नावही त्यांच्या श्रद्धेच्या भावनेतून आले.

**केरूजी दादांच्या जीवनाचा एक धडा**

**प्रतिकूल परिस्थिती ही आयुष्याची मर्यादा नसते; ती आपल्या सामर्थ्याची परीक्षा असते. पैसा मिळविण्यापेक्षा प्रामाणिकपणाने जगलेले आयुष्य अधिक मोठी कमाई असते-केरूजी घुले यांनी हे आपल्या कृतीतून दाखवून दिले.**

केरूजी घुले हे माझे घनिष्ठ मित्र आहेत. आज मागे वळून पाहताना केरूजींच्या प्रवासात शेती आहे, नोकरी आहे, सरकारी जबाबदारी आहे, प्रामाणिकपणाच्या परीक्षा आहेत, व्यवसायातील चढ-उतार आहेत, अध्यात्म आहे, समाजाशी असलेले नाते आहे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे माणूसपण आहे. त्यांच्या आयुष्यातील अनेक प्रसंगांना ते स्वामी समर्थ आणि समशृंगी देवीची कृपा मानतात. संकटातून वाचण्याचे प्रसंग, अपघातातून बचाव, कामगारांवरील संकटे, वन्यप्राण्यांशी आलेले प्रसंग-या सगळ्यांकडे ते श्रद्धेच्या नजरेने पाहतात. त्यांच्या श्रद्धेशी सहमत असो वा नसो, त्या श्रद्धेने त्यांना दिलेली मानसिक शक्ती मात्र त्यांच्या जीवनातून स्पष्टपणे दिसते. माझ्यासाठी केरूजींची खरी ओळख त्यांच्या उद्योगाच्या आकारात नाही. ती त्यांच्या स्वभावाच्या उंचीत आहे. केरूजी म्हणजे माझ्या दृष्टीने कृतार्थ मी या शब्दांना जगून दाखवणारा माणूस. त्यांच्या आयुष्याची खरी श्रीमंती त्यांच्या घरात, उद्योगात किंवा मिळवलेल्या मान-सन्मानात नाही; ती त्यांनी आयुष्यभर जपलेल्या माणसांत आहे. म्हणूनच त्यांच्याकडे पाहताना मला नेहमी एका वटवृक्षाची आठवण होते-स्वतः उन्हात उभा राहून इतरांना सावली देणारा, स्वतःची मुळे खोलवर रोवून अनेकांना आधार देणारा आणि काळ बदलला तरी आपली ओळख न बदलणारा.

**एस. झेड. देशमुख सर**
**ज्येष्ठ व्याख्याते,**
**चार्टर्ड अकाऊंटंट,**
**प्रांताध्यक्ष - पतित पावन संघटना**

# दादांनी दिले संस्कार, चंदनने दिली दिशा, आणि भूषण घेऊन चाललाय पुढे वारसा...



# आमचे दादा : आमच्या आयुष्याचा आधारवड

## कष्ट, संस्कार, प्रामाणिकपणा आणि माणुसकीचा चंदनी सुगंध



घरातील एखाद्या व्यक्तीचे मोठेपण बाहेरच्या जगाला तिच्या कर्तृत्वातून दिसते; पण त्या व्यक्तीचे खरे रूप कळते ते घराच्या उंबरठ्याच्या आत. बाहेरच्या जगासाठी केरूजी भिवाजी घुले हे उद्योजक, कर्तृत्ववान अधिकारी, श्रद्धावान व्यक्तिमत्त्व आणि समाजाभिमुख माणूस आहेत. पण आमच्यासाठी त्यांची ओळख या सगळ्यांपेक्षा वेगळी आणि अधिक जिव्हाळ्याची आहे ते आमचे दादा आहेत. आमच्या आयुष्याला दिशा देणारे, संकटात आधार देणारे, चांगले-वाईट समजावून सांगणारे आणि स्वतःच्या आयुष्याचा मोठा भाग कुटुंबासाठी देणारे आमचे दादा. २० सप्टेंबर १९४६ रोजी सावरगाव घुलेच्या मातीत दादांचा जन्म झाला. घरची परिस्थिती साधी होती. काही एकर कोरडवाहू शेती, वडिलांची शिक्षकाची नोकरी आणि मोठे कुटुंब-या सगळ्यांच्या सावलीत त्यांचे बालपण गेले. घरात ऐश्वर्य नव्हते; पण संस्कारांची कमतरता नव्हती. आज आम्ही दादांकडे पाहतो तेव्हा त्यांच्या स्वभावातील शिस्त, साधेपणा आणि प्रामाणिकपणाची मुळे कुठे आहेत, याचे उत्तर त्यांच्या बालपणातच सापडते. आईचे कष्ट आणि वडिलांचे शिक्षक म्हणून असलेले संस्कार त्यांच्या व्यक्तिमत्त्वात खोलवर रुजले.

दादा पाच भावंडांमध्ये ज्येष्ठ. ज्येष्ठ भाऊ असणे म्हणजे केवळ वयाने मोठे असणे नव्हे, तर कुटुंबाच्या सुख-दुःखाची जबाबदारी आपल्या खांद्यावर घेणे. दादांनी ही जबाबदारी आयुष्यभर मनापासून स्वीकारली. भीमरावकाका, शकुंतलाकाकू, गंगाधरकाका आणि विमलकाकू यांच्या आयुष्यात दादांचा आधार कायम राहिला. भावंडांचे प्रश्न हे आपलेच प्रश्न आहेत, ही भावना त्यांनी कधी मनातून जाऊ दिली नाही. स्वतः पुढे जाताना आपल्या माणसांना मागे ठेवायचे नाही, हा त्यांच्या जगण्याचा स्वभावच बनला.

दादांच्या बालपणाची कहाणी आजच्या पिढीने ऐकली तर ती एखाद्या चित्रपटातील प्रसंगासारखी वाटेल. गावातील शाळा, पुढे सारोळे पठारावर तीन किलोमीटरचा पायी प्रवास, डब्यातील भाकरी आणि मिरचीचा ठेचा आणि कष्टाला कधीही कमीपणा न मानणारे जीवन. सातवीपर्यंत शिक्षण झाल्यानंतर पुढे शिक्षणाची सोय नसल्याने काही काळ दादांना घरी राहून गुरे राखावी लागली. पण परिस्थितीने त्यांच्या मनातील शिकण्याची इच्छा मोडली नाही. उलट, आपल्याला शिकायचेच या जिद्दीने त्यांनी पुढची वाट धरली. संगमनेरच्या सर डी. एम. पेटीट हायस्कूलमध्ये त्यांनी शिक्षण घेतले. पुढे संगमनेर कॉलेजमध्येही शिक्षण पूर्ण केले. आर्थिक परिस्थिती मर्यादित असताना स्वतः स्वयंपाक करून, काटकसरीने राहून त्यांनी शिक्षणाचा प्रवास केला. आम्ही मुली आज आपल्या शिक्षणाकडे मागे वळून पाहतो तेव्हा दादांचा हा संघर्ष अधिक प्रकर्षाने जाणवतो. स्वतःला शिक्षण मिळवण्यासाठी अडचणी आल्या म्हणून त्यांनी आमच्यासाठी अडथळे निर्माण केले नाहीत; उलट शिक्षण हे आयुष्य बदलण्याचे सर्वांत मोठे साधन आहे, हा विश्वास आमच्या मनात रुजवला.

दादांच्या आयुष्यात श्रद्धेचे स्थान अत्यंत मोठे आहे. आमच्या घराण्याची श्री सप्तशृंगी मातेवरील श्रद्धा त्यांच्या मनात लहानपणापासूनच दृढ होती. पुढे श्री स्वामी समर्थांच्या सेवेशी त्यांचे नाते जोडले गेले. मंगळवारचा उपवास, सप्तशृंगी गडावरील प्रदक्षिणा, पौर्णिमेच्या वाऱ्या आणि दिंडोरी येथील श्री स्वामी समर्थ केंद्रातील सेवा-हे त्यांच्या जीवनाचे अविभाज्य भाग बनले. दादा श्रद्धाळू आहेत; पण त्यांच्या श्रद्धेत निष्क्रियता नाही. देवावर विश्वास ठेवायचा आणि त्याचवेळी आपले कर्तव्य पूर्ण ताकदीने करायचे, हा त्यांचा स्वभाव आहे. दादांच्या संसारात आई-प्रमिलाताई -ही त्यांची अत्यंत महत्त्वाची सहप्रवासी आहे. १९७० मध्ये त्यांचा विवाह झाला. नोकरीच्या बदल्या, शेती, घरच्या जबाबदाऱ्या, मुलांचे संगोपन, सततची धावपळ आणि बदलती परिस्थिती-आईने हे सारे अतिशय संयमाने सांभाळले. दादा बाहेरच्या जबाबदाऱ्या पार पाडत असताना घराचा मोठा आधार आईने सांभाळला.

म्हणूनच दादांच्या यशाची गोष्ट सांगताना आईचा त्याग आणि साथ कधीही विसरता येणार नाही. दादांच्या कष्टांना आईच्या निःशब्द सहकार्याची जोड मिळाली आणि त्यातून आमचे घर घडत गेले. दादांचा नोकरीचा प्रवासही त्यांच्या स्वभावाचे अनेक पैलू दाखवणारा आहे. बी.कॉम.नंतर संगमनेर शेती संघात कामाची सुरुवात झाली. पुढे महाराष्ट्र शासनाच्या कापूस एकाधिकार खरेदी योजनेत प्रथम श्रेणी अधिकारी म्हणून जबाबदारी मिळाली. नोकरीच्या काळात अनेक ठिकाणी काम करताना वेगवेगळ्या परिस्थितींना सामोरे जावे लागले. आर्थिक प्रलोभने आणि दबाव आले; पण दादांनी चुकीच्या मार्गाने पैसा कमावण्यापेक्षा प्रामाणिकपणाला महत्त्व दिले. अचलपूरमधील प्रसंगात अनैतिक व्यवहाराला त्यांनी नकार दिला. दुसऱ्या एका प्रसंगात कर्मचाऱ्यांकडून जबरदस्तीने पैसे उकळणाऱ्या व्यक्तीविरुद्ध त्यांनी पोलिसांत तक्रार करण्याचे धाडस दाखवले. आम्हाला दादांकडून मिळालेली सर्वांत मोठी शिकवण याच ठिकाणी जाणवते-परिस्थितीशी जुळवून घ्या; पण तत्त्वांशी तडजोड करू नका. पैसा पुन्हा कमावता येतो; पण एकदा गेलेला विश्वास आणि प्रतिष्ठा सहज परत मिळत नाही. १९८८ मध्ये दादांनी नोकरीचा राजीनामा दिला आणि कुटुंबाच्या व्यवसायात प्रवेश केला. भाऊ गंगाधरकाकांनी उभ्या केलेल्या शेती, कृषी सेवा केंद्र आणि हुंडेकरी व्यवसायाला त्यांनी साथ दिली. पुढे टोमॅटो व्यापाराचा विस्तार झाला. विविध राज्यांमध्ये व्यापार सुरू झाला. व्यवसायातील अडचणींना सामोरे जाताना दादांनी कधीही जबाबदारीपासून पळ काढला नाही.

विशाखापट्टणमला गेलेला एक तरुण परत न आल्याने निर्माण झालेली चिंता याचे उत्तम उदाहरण आहे. तो कुठे आहे, याची माहिती मिळत नसताना दादा स्वतः त्याच्या शोधासाठी गेले. अनोळखी शहर, अनोळखी भाषा आणि अनिश्चित परिस्थिती असूनही त्यांनी पोलिस ठाणी, रेल्वे स्थानके आणि इतर ठिकाणी शोध घेतला. शेवटी तो तरुण सुरक्षित असल्याचे समजले. या प्रसंगातून आम्हाला दादांमधील व्यावसायिकापेक्षा मोठा माणूस दिसतो.

१९८८ ते २०१८ या काळात दादांनी एलआयसी एजंट म्हणूनही सुमारे तीन दशके काम केले. लोकांशी नाते जोडणे आणि त्यांचा विश्वास मिळवणे ही त्यांची खासियत होती. त्यांच्या जीवनात माणसे हीच खरी संपत्ती राहिली. आज त्यांच्या आजूबाजूला असलेली नाती पाहिली की त्याची प्रचिती येते. १९९६ च्या आसपास दादांनी वयाच्या पन्नाशीत मसाला उद्योगाचा श्रीगणेशा केला. त्या वयात नव्या व्यवसायाची सुरुवात करणे म्हणजे मोठे धाडस. पण दादांनी आयुष्यभर परिस्थितीला कारण केले नाही; त्यांनी परिस्थितीतून मार्ग काढला. जगदंबा फूड प्रॉडक्ट्स ची पायाभरणी झाली. 'जगदंबा' हे नाव त्यांच्या सप्तशृंगी मातेवरील श्रद्धेचे प्रतीक आहे. आज या उद्योगाची भव्यता पाहताना आम्हाला त्यामागे उभे असलेले दादांचे असंख्य दिवस, रात्री, कष्ट आणि निर्णय दिसतात. या उद्योगाच्या पुढच्या वाटचालीत माझा भाऊ चंदन दादांच्या खंबीरपणे सोबत उभा राहिला. बी.कॉम.नंतर त्याने व्यवसायात प्रवेश केला आणि हळूहळू जबाबदाऱ्या स्वीकारत उद्योगाचा विस्तार केला. दादांनी चंदनला केवळ व्यवसाय शिकवला नाही; त्यांनी त्याला **व्यवसायामागची मूल्ये दिली. व्यवहारात माणूस मोठा असतो, पैसा नाही-हा विचार त्याच्यात रुजवला. आम्हा मुलींसाठीही दादांनी शिक्षण आणि स्वावलंबनाला नेहमी महत्त्व दिले. आम्ही आपल्या क्षेत्रात पुढे जावे, स्वतःची ओळख निर्माण करावी, यासाठी त्यांनी प्रोत्साहन दिले. मुलगा आणि मुलगी असा भेद न करता मुलांच्या प्रगतीकडे पाहणारे दादा आम्ही अनुभवले.

१९ मे १९९७ रोजी वैशाली आमच्या कुटुंबात आली. सून म्हणून घरात आलेली वैशाली पुढे दादांसाठी मुलगीच झाली. मसाला उद्योगातील उत्पादन विभागाची जबाबदारी सांभाळताना तिने उद्योगाच्या वाढीत महत्त्वपूर्ण योगदान दिले. घर आणि व्यवसाय या दोन्ही जबाबदाऱ्या सांभाळताना तिच्या कष्टांचा दादांनी नेहमीच सन्मान केला. आज भूषण आणि अक्षदा यांच्या रूपाने पुढची पिढीही कुटुंबाशी जोडली गेली आहे. दादांना उद्योगाची वाढ जितकी महत्त्वाची वाटते, तितकाच कुटुंबातील एकोपा आणि संस्कारांचा वारसा महत्त्वाचा वाटतो. पुढची पिढी मोठी व्हावी; पण मुळांपासून दूर जाऊ नये, अशी त्यांची मनापासून इच्छा आहे. दादांच्या मनात आई-वडिलांबद्दल असलेली कृतज्ञता आम्ही जवळून अनुभवली आहे. १९८९ मध्ये त्यांनी आपल्या आई-वडिलांना विमानाने पुणे-मुंबई प्रवास घडवून आणला. त्यांच्यासाठी हा केवळ प्रवास नव्हता; आयुष्यभर केलेल्या त्यागाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा तो एक छोटासा प्रयत्न होता. पुढे कुटुंबासोबत भारतातील अनेक तीर्थक्षेत्रांना आणि परदेशातील विविध ठिकाणी प्रवास करण्याची संधी मिळाली. संघर्षातून मिळालेले सुख त्यांनी कधीही दिखाऊपणाने मिरवले नाही.

### कष्ट आणि प्रामाणिकपणाची शिकवण देणारे आमचे दादा

**दादांनी आम्हाला केवळ घर दिले नाही; त्यांनी घरपण दिले. केवळ व्यवसाय दिला नाही; कष्टाची आणि प्रामाणिकपणाची शिदोरी दिली. केवळ संपत्ती दिली नाही; तर एकमेकांच्या सोबत उभे राहण्याचे संस्कार दिले. त्यांच्या नावावर किती आहे यापेक्षा, त्यांच्या नावामुळे आज किती माणसे एकत्र उभी आहेत-हीच त्यांच्या आयुष्याची खरी कमाई आहे.**

दादांची आणखी एक विशेष ओळख म्हणजे देण्याची वृत्ती. अन्नदान असो, धार्मिक कार्य असो, सामाजिक मदत असो किंवा कुटुंबातील कोणाची अडचण असो-शक्य असेल तेथे मदतीला उभे राहणे हा त्यांचा स्वभाव आहे. त्यांनी आयुष्यभर जसे पेराल तसे उगवते हा विचार आचरणात आणला. आज वयाची ८० वर्षे पूर्ण करताना आम्ही दादांकडे पाहतो तेव्हा एक मोठा प्रवास आमच्या डोळ्यांसमोर उभा राहतो-सावरगावची माती, कष्टाचे बालपण, शिक्षणासाठीची धडपड, नोकरीतील प्रामाणिकपणा, व्यवसायातील धाडस, जगदंबा फूड प्रॉडक्ट्सची उभारणी, श्रद्धा, समाजाशी जोडलेली नाती आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे **कुटुंबाला एकत्र ठेवण्याची ताकद. बाहेरच्या जगाला दादांचा उद्योग दिसतो; आम्हाला त्यामागचा माणूस दिसतो. बाहेरच्या जगाला त्यांचे यश दिसते; आम्हाला त्या यशामागचे त्याग दिसतात. बाहेरच्या जगाला त्यांची भव्य वास्तू दिसते; आम्हाला तिच्या पायाभरणीत मिसळलेले दादांचे कष्ट दिसतात. म्हणूनच आमच्यासाठी दादा म्हणजे केवळ घरातील ज्येष्ठ व्यक्ती नाहीत. ते आमच्या आयुष्याचा आधारवड आहेत. त्यांच्या सावलीत आम्ही वाढलो, त्यांच्याकडून मूल्ये शिकलो आणि त्यांच्या कर्तृत्वाकडून स्वप्ने पाहायला शिकलो.

वटवृक्ष स्वतःसाठी सावली निर्माण करत नाही. तो स्वतः उन्हात उभा राहतो आणि इतरांना सावली देतो. दादांचे आयुष्यही तसेच आहे. त्यांनी स्वतः कष्ट सोसले, पण आम्हाला सुखाची सावली दिली. त्यांनी स्वतः अनेक वाटा चालून पाहिल्या, पण आम्हाला योग्य वाट निवडण्याची शिकवण दिली. त्यांनी स्वतःच्या आयुष्याचा मोठा भाग कुटुंबासाठी दिला आणि त्या कुटुंबाच्या प्रत्येक फांदीला स्वतःच्या मायेची जोड दिली. आज त्यांच्या आत्मचरित्राचे नाव 'कृतार्थ मी' आहे. हे नाव वाचताना मला वाटते-दादांनी आयुष्यात काय मिळवले, यापेक्षा त्यांनी किती माणसे जोडली, किती आयुष्यांना आधार दिला आणि किती संस्कार पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवले, याचे उत्तर या दोन शब्दांत सामावले आहे. दादा, तुमच्याकडून आम्हाला मिळालेली सर्वांत मोठी संपत्ती म्हणजे तुमचे संस्कार. कष्ट करण्याची तयारी, संकटात न डगमगण्याची जिद्द, प्रामाणिकपणे जगण्याची हिंमत, देवावरची श्रद्धा, माणसांवरचे प्रेम आणि कुटुंबाला नेहमी स्वतःपेक्षा पुढे ठेवण्याची वृत्ती-हीच आमच्या घराची खरी श्रीमंती आहे.

तुम्ही चंदनाप्रमाणे आयुष्यभर झिजलात आणि आम्हाला सुगंध दिलात. आज तुमच्या कर्तृत्वाचा हा चंदनी सुगंध दूरवर दरवळत आहे. आमच्यासाठी एवढेच पुरेसे आहे की- तुम्ही आमचे दादा आहात. आणि आम्ही तुमच्या मुली आहोत, हीच आमच्या आयुष्यातील एक मोठी कृतार्थता आहे.

**वृषाली सोपान नांदे - पाचेगाव**
**हर्षा सुदर्शन हांडे - उम्रज**
**केरूजी भिवाजी घुले यांच्या कन्या**


रजि.नं. ए.-१२३७ (अ.नगर) ॥ ॐ नमः शिवाय ॥ रजि.ता.0१/0८/२००५






वर्ष २७ वे

**सामुदायिक भव्य श्रावण समाप्ती सोहळा**

**ॐ इच्छापुर्ती कपारेश्वर शिव मंदिर ट्रस्ट, श्री क्षेत्र खांडगाव**

श्री संत प.पु. गुरुवर्य श्री स्वामी रामनंदगिरी महाराज (सितारामजी महाराज) यांच्या कृपा आशिर्वादाने

**रामचरित्र मानस व नवनाथ पारायण आणि श्रावण समाप्ती सोहळा**

सर्व धर्मानुरागी भाविकांस कळविण्यास अत्यंत आनंद वाटतो की, सालाबादप्रमाणे याही वर्षी भगवंताच्या कृपेने, संतांच्या आशिर्वादाने व मार्गदर्शनाने परिसरातील सर्व भाविकांच्या सहकार्याने, **भाद्रपद शु॥ २ रविवार दि. १३/०९/२०२६ रोजी** जाहिर किर्तनाचे व भंडाराचे आयोजन केले आहे. तरी या सोहळ्यासाठी खालील विभुतीचे आगमन होणार आहे.



**महंत सद्गुरु श्री रामगिरीजी महाराज**

(मठाधिपती सद्गुरु गंगागिरी महाराज संस्थान, श्रीक्षेत्र गोदावरी धाम, सराला बेट)
यांचे जाहिर किर्तन या शिवाय पंचक्रोशितील थोर साधुसंतांचे आगमन होणार आहे त्या निमित्ताने समाजात सहिष्णुता, प्रेम, ज्ञान वृद्धींगत व्हावे म्हणून त्यांच्या अमृतमय किर्तनाचा व दर्शनाचा सर्व भाविकांनी लाभ घ्यावा ही नम्रतेची विनंती.

| | | |
|---|---|---|
| रविवार दि. १३/०९/२०२६ | पहाटे ४ ते ६ वा. | महाआरती (होम, हवन, पुजा) |
| | सकाळी ६ ते ७ वा. | रामायण ग्रंथ आरती |
| | सकाळी १0 ते ११.३0 वा. | भव्य-दिव्य रामायण मिरवणुक |
| | **सकाळी ११.३० ते १.३०** | **महंत सद्गुरु श्री रामगिरीजी महाराज** यांचे जाहिर किर्तन होईल. |
| | दुपारी १.३0 ते ५ वा. पर्यंत | महाप्रसादाचा कार्यक्रम |

वरील प्रमाणे भव्य श्रावण सोहळा समाप्ती आयोजित केलेला आहे, तरी सर्व भाविक बंधुंनी आणि भगिनींनी या सोहळ्यास तन,मन व धनाने सहभागी व्हावे ही नम्र विनंती.

✻ आपले नम्र ✻
ॐ ईच्छापुर्ती कपारे खांडेश्वर शिव मंदिर ट्रस्ट व समस्त ग्रामस्थ खांडगाव (डोंगरावरील गुहा)
खांडगाव, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर व सर्व शिवभक्त परिवार (डोंगरावरील गुहा)

ऑनलाईन देणगीसाठी सोबतचा QR वापरा.

✻ संपर्क ✻
प्रविण प्रभाकर गुंजाळ (अध्यक्ष) 9420343040
रामभाऊ रेवजी गुंजाळ (सचिव) 9096897490

**स्थळ : डोंगरावरील शिवगुहा मंदिर, श्री क्षेत्र खांडगाव, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर**


# शाळेच्या समस्या सोडविण्यासाठी नगरसेविका साक्षी सूर्यवंशी सरसावल्या

## विद्यार्थिनींशी संवाद साधत सुविधांची केली पाहणी



संगमनेर (प्रतिनिधी) - नगरपरिषदेच्या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींना दर्जेदार शिक्षणासोबतच आवश्यक त्या भौतिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी शिवसेना नगरसेविका सौ. साक्षी सूर्यवंशी यांनी पुढाकार घेतला आहे. घासबाजार येथील अहिल्यादेवी कन्या शाळा क्र. ४ येथे त्यांनी नुकतीच सदिच्छा भेट देऊन शाळेची प्रत्यक्ष पाहणी केली तसेच शिक्षकांकडून विविध समस्या जाणून घेत त्या तातडीने सोडविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले.

या भेटीदरम्यान सौ. सूर्यवंशी यांनी शाळेतील विविध वर्गांना भेट देत विद्यार्थिनींशी आपुलकीने संवाद साधला. त्यांच्या अभ्यासाबरोबरच आवडीनिवडी, शैक्षणिक अडचणी याबाबत विचारपूस करून त्यांनी विद्यार्थिनींचा उत्साह वाढविला. त्यानंतर शाळेच्या इमारतीची पाहणी करत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छतागृहांची स्थिती, वर्गखोल्यांमधील प्रकाश व हवेशीरपणा तसेच क्रीडांगण आदी सुविधांचा आढावा घेतला.

त्यानंतर नगरसेविका सूर्यवंशी यांनी मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व कर्मचाऱ्यांसोबत सविस्तर चर्चा केली. यावेळी शाळेसमोरील विविध अडचणी, शैक्षणिक साहित्याची आवश्यकता, दुरुस्तीची कामे तसेच विद्यार्थिनींसाठी आवश्यक असलेल्या इतर मूलभूत सुविधांची माहिती शिक्षकांनी त्यांना दिली.

यावेळी सौ. साक्षी सूर्यवंशी म्हणाल्या, मुलींचे शिक्षण ही समाजाच्या प्रगतीची सर्वांत मोठी ताकद आहे. नगरपरिषदेच्या अहिल्यादेवी कन्या शाळेतील विद्यार्थिनी कोणत्याही मूलभूत सुविधांपासून वंचित राहू नयेत, यासाठी आपण कटिबद्ध आहोत. शिक्षकांनी मांडलेल्या समस्या रास्त असून, त्या नगरपालिकेच्या आगामी बैठकीत मांडून आवश्यक निधी व सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पाठपुरावा केला जाईल. शाळा प्रशासनाला जेव्हा जेव्हा मदतीची गरज भासेल, तेव्हा शिवसेना त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

लोकप्रतिनिधींनी स्वतःहून शाळेला भेट देत विद्यार्थिनी व शिक्षकांच्या अडचणी जाणून घेतल्याबद्दल मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व पालकांनी सौ. साक्षी सूर्यवंशी यांचे आभार मानले. त्यांच्या पुढाकारामुळे शाळेच्या प्रलंबित प्रश्नांना गती मिळून विद्यार्थिनींना अधिक चांगल्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध होतील, अशी अपेक्षाही यावेळी व्यक्त करण्यात आली.

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!



राजहंस

दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ

संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.

अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर

(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२

www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com



संगमनेरकरांनी गौरविलेले

।।जय श्रीराम।।

सुपर शॉपी

निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक

जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर

एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्

प्रोप्रा. अशोक रा. जाधव

फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२

क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's

धन्वंतरी

मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल

डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४

डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४

उपलब्ध सुविधा

मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत

डायलेसिस सुविधा उपलब्ध

या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा

संपर्क

८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४

७६२०३८८२३०




# मतदार यादी पुनरीक्षणात दक्षता घ्या - डॉ. प्रवीण गेडाम



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- मतदार यादी पुनरीक्षणाची प्रक्रिया अधिक गतिमान करताना प्रत्येक मतदाराची नोंद अचूकपणे तपासून मतदार यादी अद्ययावत, पारदर्शक व विश्वासार्ह करावी. पात्र मतदाराचे नाव कोणत्याही परिस्थितीत चुकीने वगळले जाणार नाही, याची विशेष दक्षता घ्यावी. प्राप्त दावे व हरकतींची नियमानुसार वस्तुनिष्ठ व काटेकोर छाननी करून निष्पक्ष निर्णय घ्यावेत, असे निर्देश विभागीय आयुक्त तथा मतदार यादी निरीक्षक डॉ. प्रवीण गेडाम यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात डॉ. गेडाम यांच्या अध्यक्षतेखाली मतदार यादी पुनरीक्षणाचा आढावा तसेच सर्व राजकीय पक्षांच्या पदाधिकारी व प्रतिनिधींची बैठक झाली. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुनील गाडे, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी व प्रतिनिधी तसेच संबंधित मतदारसंघांचे निवडणूक निर्णय अधिकारी उपस्थित होते.

मतदार यादी पुनरीक्षणात क्षेत्रीय पातळीवर कार्यरत असलेल्या बीएलओंची भूमिका महत्त्वाची आहे. त्यामुळे त्यांच्या कामाचा नियमित आढावा घेऊन आवश्यक मार्गदर्शन करावे. प्रत्येक मतदाराची नोंद तपासताना संबंधित कागदपत्रे, उपलब्ध माहिती आणि प्रत्यक्ष पडताळणी यांचा योग्य समन्वय साधावा, असे डॉ. गेडाम यांनी सांगितले. मतदार यादीतील दुबार नोंदी, स्थलांतरित मतदार, मृत मतदारांच्या नोंदी तसेच अन्य आवश्यक बदलांची योग्य पडताळणी करावी. प्राप्त दावे व हरकतींची नियमानुसार तपासणी करून पारदर्शकपणे निर्णय घ्यावा, असेही त्यांनी निर्देशित केले.

आगामी काळात मतदान केंद्रांची रचना करताना मतदारांना कोणतीही अडचण होणार नाही, याची दक्षता घ्यावी. मतदान केंद्राचे स्थान, मतदारांची संख्या, प्रवेशाची सुलभता आणि मूलभूत सुविधांचा विचार करावा. ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व गरजू मतदारांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. नागरिकांनी मतदार यादीतील आपले नाव, पत्ता, वय व इतर तपशील अचूक आहेत का, याची स्वतः पडताळणी करावी. त्रुटी आढळल्यास संबंधित निवडणूक कार्यालयाशी संपर्क साधून नियमानुसार दुरुस्ती करून घ्यावी. पात्र नागरिकांनी मतदार यादीत आपली नोंद असल्याची खात्री करून घेण्याचे आवाहन डॉ. गेडाम यांनी केले. यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुनील गाडे यांनी सादरीकरणाद्वारे मतदार यादी पुनरीक्षण कार्यक्रमाची सद्यस्थिती, प्राप्त अर्ज व आतापर्यंत झालेल्या कार्यवाहीची माहिती दिली.

## राष्ट्रीय स्पर्धेसाठी अहिल्यानगरच्या टेनिक्वाईट खेळाडूंची निवड चाचणी

युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर- हैदराबाद येथे होणाऱ्या राष्ट्रीय टेनिक्वाईट (रिंग टेनिस) स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा संघ निवडण्यात येणार असून, त्यासाठी राज्यस्तरीय निवड प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. टेनिक्वाईट असोसिएशन महाराष्ट्र यांच्या वतीने १८ वर्षांखालील मुला-मुलींची ज्युनिअर राज्य टेनिक्वाईट अजिंक्यपद स्पर्धा दि. २ ते ४ ऑक्टोबर २०२६ दरम्यान पिंपरी-चिंचवड, निगडी येथे आयोजित करण्यात आली आहे.

या राज्यस्तरीय स्पर्धेत अहिल्यानगर जिल्ह्याचा संघ सहभागी व्हावा, यासाठी जिल्ह्यातील गुणवंत व पात्र खेळाडूंची निवड करण्यात येणार आहे. त्यानुसार अहिल्यानगर टेनिक्वाईट असोसिएशनच्या वतीने रविवार, दि. १३ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता संगमनेर येथील श्रमिक कनिष्ठ विद्यालयाच्या मैदानावर जिल्हास्तरीय निवड चाचणी आयोजित करण्यात आली आहे. या निवड चाचणीमध्ये जिल्ह्यातील १८ वर्षांखालील मुले व मुली सहभागी होऊ शकणार आहेत. खेळाडूचा जन्म १ जानेवारी २००८ रोजी किंवा त्यानंतरचा असणे आवश्यक आहे. निवड चाचणीदरम्यान खेळाडूंच्या खेळातील कौशल्य, शारीरिक क्षमता, तांत्रिक बाबी तसेच सामन्यातील कामगिरीचा विचार करून जिल्ह्याच्या संघासाठी खेळाडूंची निवड केली जाणार आहे. निवड चाचणीतून पात्र ठरणाऱ्या खेळाडूंना अहिल्यानगर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार असून, त्यानंतर ते पिंपरी-चिंचवड, निगडी येथे होणाऱ्या राज्यस्तरीय अजिंक्यपद स्पर्धेत सहभागी होतील. या स्पर्धेतील उल्लेखनीय कामगिरीच्या आधारे राष्ट्रीय टेनिक्वाईट स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या संघाची निवड होणार असल्याने जिल्ह्यातील खेळाडूंसाठी ही निवड चाचणी महत्त्वाची ठरणार आहे. टेनिक्वाईट या खेळाला जिल्ह्यात अधिकाधिक प्रोत्साहन मिळावे तसेच ग्रामीण आणि शहरी भागातील नवोदित खेळाडूंना राज्य व राष्ट्रीय स्तरावर आपले कौशल्य दाखविण्याची संधी मिळावी, या उद्देशाने ही निवड प्रक्रिया राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील पात्र खेळाडूंनी आवश्यक कागदपत्रांसह वेळेत उपस्थित राहून निवड चाचणीत सहभागी व्हावे आणि या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन अहिल्यानगर टेनिक्वाईट असोसिएशनच्या वतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी प्रा. बाबासाहेब गायकवाड (९८५०९२२९२४), प्रा. सुनील मंडलिक (९९७५७५२८५७) किंवा प्रा. भागवत उगले (८२०८१५८२३८) यांच्याशी संपर्क साधावा.

# सिद्धकला आयुर्वेद महाविद्यालयात उत्कृष्ट शिक्षक पुरस्कारांचे वितरण



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - वसंत कुसुम रुरल योग व आयुर्वेदिक संशोधन प्रतिष्ठान संचलित सिद्धकला आयुर्वेद महाविद्यालयाच्या वतीने स्व. डॉ. किशोर वसंत सराफ यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ जिल्हास्तरीय 'उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार २०२६', 'प्रेरणार्थ शिक्षक पुरस्कार २०२६' तसेच "Research Excellence and Innovation Award' वितरण सोहळा उत्साहात पार पडला.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी दिलेले योगदान आणि उल्लेखनीय शैक्षणिक कार्याबद्दल रुख्मिणी आयुर्वेद महाविद्यालयाचे डॉ. रविन चांडक यांना जिल्हास्तरीय 'उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला. विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन तसेच अध्यापन क्षेत्रातील योगदानाबद्दल अश्विन रुरल आयुर्वेद कॉलेजचे डॉ. निशांत इंगळे आणि सिद्धकला आयुर्वेद महाविद्यालयाच्या डॉ. स्नेहा कामरे यांना 'प्रेरणार्थ शिक्षक पुरस्कार २०२६'ने सन्मानित करण्यात आले. संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल "Research Excellence and Innovation Award' हा पुरस्कार सिद्धकला आयुर्वेद महाविद्यालयाच्या डॉ. प्राजक्ता अभंग आणि डॉ. उषासी घोष चौधरी यांना प्रदान करण्यात आला.

सर्व पुरस्कार ज्येष्ठ आयुर्वेदतज्ज्ञ वैद्य विनय वेलणकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. शिक्षक व संशोधकांच्या उल्लेखनीय कार्याचा गौरव करणाऱ्या या उपक्रमामुळे अध्यापन, संशोधन आणि नवोपक्रम क्षेत्रात कार्यरत असणाऱ्यांना नवी प्रेरणा मिळणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. याच कार्यक्रमात 'स्व. डॉ. किशोर वसंत सराफ व्याख्यानमाला' या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. या व्याख्यानमालेतील पहिले व्याख्यान वैद्य विनय वेलणकर यांनी 'अल्प मूल्य - बहुगुणी चिकित्सा' या विषयावर दिले. या व्याख्यानमालेअंतर्गत दर महिन्याला नामवंत आयुर्वेदतज्ज्ञांचे एक व्याख्यान आयोजित करण्यात येणार आहे.

संस्थेच्या अध्यक्ष डॉ. जयश्री सराफ, एमडी डॉ. नैमिष सराफ, एमयूएचएस बीओएस सदस्य डॉ. ऋता सराफ, प्राचार्य डॉ. सुयोग व्यास, डॉ. ओंकार कोटींकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. अश्विन रुरल आयुर्वेद महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शामल निर्मळ, रुख्मिणी आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सोमेश वैद्य तसेच आयुर्वेद व्यासपीठ शाखेचे पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

# अल्प पावसाच्या पार्श्वभूमीवर टंचाई निवारणासाठी प्रशासनाने सज्ज राहावे - पालकमंत्री विखे पाटील



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - यंदा जिल्ह्यात पावसाचे प्रमाण अत्यल्प असल्याने संभाव्य टंचाईसदृश्य परिस्थितीचा सामना करण्यासाठी प्रशासनाने संवेदनशीलता आणि तत्परतेने काम करावे. गावनिहाय पाणीपुरवठ्याचे सूक्ष्म नियोजन करून नागरिकांना नियमित पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे, असे निर्देश पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात टंचाईसदृश्य परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी बैठक झाली. यावेळी आमदार काशिनाथ दाते, आमदार अमोल खताळ, आमदार विठ्ठलराव लंघे, जिल्हाधिकारी डॉ. पंकजा आशिया, मनपा आयुक्त यशवंत डांगे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीत जिल्ह्यातील पाणीपुरवठा, टँकरद्वारे पाणी वितरण, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या योजना, स्थानिक जलस्रोत, चारा उपलब्धता, पशुधन आणि आगामी पीक नियोजनाचा आढावा घेण्यात आला.

गटविकास अधिकारी आणि तहसीलदारांनी स्थानिक लोकप्रतिनिधींशी समन्वय साधून गावनिहाय पाणीपुरवठ्याचे नियोजन करावे. टँकर सुरू असलेल्या गावांमध्ये नागरिकांना टँकरच्या वेळेची माहिती सहज मिळावी, यासाठी पद्धारे वेळापत्रक निश्चित करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या प्रलंबित योजना तातडीने पूर्ण कराव्यात. थकीत पाणीपट्टी व वीज देयके भरून बंद असलेल्या योजना पुन्हा सुरू करण्याची शक्यता तपासावी. गावाजवळील विहिरी, तलाव आणि इतर उपलब्ध जलस्रोतांचा प्रभावी वापर करावा. आवश्यकतेनुसार विहीर व तलाव अधिग्रहणाची प्रक्रिया राबवावी. जलस्रोतांवर फिल्टरची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून निधी देण्यात येईल, असे पालकमंत्र्यांनी सांगितले.

जिल्ह्यातील पशुधनाची संख्या लक्षात घेऊन चारा उपलब्धतेचे नियोजन करावे. कृषी व पशुसंवर्धन विभागाने संयुक्तपणे याबाबत उपाययोजना कराव्यात. कमी जागेत चारा निर्मितीसाठी शेतकऱ्यांनी हायड्रोपोनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा, असे आवाहन त्यांनी केले. गेल्या तीन वर्षांतील पीक पद्धतीचा अभ्यास करून पर्जन्यमान, उपलब्ध पाणीसाठा आणि पिकांची पाण्याची गरज लक्षात घेऊन आगामी पीक आराखडा तयार करावा. शेतकऱ्यांना उपलब्ध पाण्यानुसार योग्य पीक पद्धतीबाबत कृषी विभागाने मार्गदर्शन करावे, असेही निर्देश देण्यात आले.

नागरिक, शेतकरी आणि पशुपालकांना कमीतकमी त्रास होईल, यासाठी पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देऊन सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे. टंचाई गंभीर होण्यापूर्वीच आवश्यक उपाययोजना हाती घ्याव्यात, असे निर्देश पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

## धांदरफळ बुद्रुक येथे 'उत्सव बळीराजाचा'

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शेती, माती आणि नाती टिकविणे अत्यंत गरजेचे आहे. बळीराजाचा बैल हा जिवाभावाचा साथीदार असून, बदलत्या काळात ट्रॅक्टरही शेतीचा महत्त्वाचा साथीदार बनला आहे. त्यामुळे बैलपोळ्यासोबत ट्रॅक्टर पोळा साजरा करण्याचा धांदरफळकरांचा उपक्रम संपूर्ण महाराष्ट्रासाठी आदर्शवत आहे, असे प्रतिपादन स्वदेश सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब देशमाने यांनी केले.



धांदरफळ बुद्रुक येथे स्वदेश सामाजिक सेवाभावी संस्था, ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या आठ वर्षांपासून 'उत्सव धांदरफळकरांचा, उत्सव बळीराजाचा' या संकल्पनेतून बैलपोळ्यासोबत ट्रॅक्टर पोळा साजरा केला जात आहे. मातीच्या बैलाचे व मानाच्या बैलाचे पूजन तसेच ग्रामदैवत श्री हनुमंतरायाचे दर्शन घेऊन उत्सवाची सुरुवात झाली. यावेळी आयुब भाई मोमीन यांनी गणेश आरती, हनुमान चालीसा व शेतकरी गीतांसह सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. वर्षभर पशुधनाची काळजी घेणाऱ्या पशुसंवर्धन अधिकारी व पशुसेवकांचा विशेष सन्मान करण्यात आला. सहभागी ट्रॅक्टर चालक-मालकांना मानाचा फेटा, सन्मानचिन्ह व रोख पारितोषिक देण्यात आले. बैलजोडी स्पर्धेत लक्ष्मण क्षीरसागर प्रथम, अभिजीत गोरडे द्वितीय, तर जानकू आडांगळे तृतीय आले. ट्रॅक्टर स्पर्धेत विशाल काळे व प्रसन्न मुळे प्रथम, सार्थक गोरडे द्वितीय, तर भारत दिवटे तृतीय आले.

कार्यक्रमास मनीष मालपाणी, रचनाताई मालपाणी, रामहरी कातोरे, भाऊसाहेब डेरे, सरपंच उज्ज्वला देशमाने, पोलीस पाटील बाळासाहेब खरात यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन दत्ता कासार यांनी केले.

बालगोपाळांनी तयार केलेले ट्रॅक्टर, जेसीबी व बैलजोड्यांचे देखावे तसेच वृक्षारोपण, मुलगी वाचवा-मुलगी शिकवा, स्वच्छ धांदरफळ व सेंद्रिय शेतीचे संदेश देणारे देखावे उत्सवाचे विशेष आकर्षण ठरले.

## विश्वकर्मा पतसंस्थेची वार्षिक सभा रविवारी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - विश्वकर्मा नागरी सहकारी पतसंस्था मर्या., संगमनेरची ३४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. १३ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी १ वाजता सुतार गल्ली येथील विश्वकर्मा समाज महादेव मंदिरात चेअरमन संपत दत्तात्रय सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.

सामान्य कारागीर व छोट्या व्यावसायिकांच्या आर्थिक उन्नतीसाठी सन १९९२ मध्ये संस्थापक चेअरमन कै. भास्करराव वाकचौरे व कै. के. एम. भालेराव यांनी सहकाऱ्यांच्या मदतीने संस्थेची स्थापना केली. आर्थिक शिस्त व सभासदहिताला प्राधान्य दिल्याने संस्था आज स्वमालकीच्या इमारतीत स्वभांडवलावर कार्यरत आहे. संस्था मागील २४ वर्षांपासून संगणकीकृत असून सातत्याने 'अ' ऑडिट वर्गात आहे.

दि. ३१ मार्च २०२६ अखेर संस्थेकडे २० कोटी ५ लाख ७० हजार रुपयांच्या ठेवी, १६ कोटी ९२ लाख २५ हजार रुपयांचे कर्ज व ७ कोटी ७६ लाख ९७ हजार रुपयांची गुंतवणूक असून, संस्थेला ३८ लाख ५६ हजार रुपयांचा नफा झाला आहे. तसेच ठेवींमध्ये सुमारे ३ कोटी ५७ लाख रुपयांची वाढ झाली आहे.

सभासदांना क्यूआर कोड व एसएमएस बँकिंगसह विविध डिजिटल सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. वार्षिक सभेत गुणवंत विद्यार्थी-विद्यार्थिनींचा बक्षीस वितरण समारंभही होणार आहे. गुणवंत विद्यार्थ्यांच्या पालकांनी मार्कशीटची छायांकित प्रत दि. १० सप्टेंबरपर्यंत संस्थेत जमा करावी. सभासद, ठेवीदार व हितचिंतकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन चेअरमन संपत सूर्यवंशी, व्हा. चेअरमन विजय सूर्यवंशी, संचालक मंडळ व व्यवस्थापक अरुण उदमले यांनी केले आहे.

# महाराष्ट्रासह पाच राज्यांना वादळी पावसाचा इशारा

मुंबई (वृत्तसंस्था)

सप्टेंबरचा दुसरा आठवडा सुरू झाला तरी देशात मान्सूनच्या परतीचा प्रवास सुरू होण्याचे कोणतेही संकेत मिळालेले नाहीत. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, दिल्लीसह अनेक राज्यांमध्ये पुढील दोन दिवस वादळी वारे आणि मेघगर्जनेसह मध्यम ते मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. सर्वसाधारणपणे १७ सप्टेंबरपर्यंत देशातील बहुतेक भागांतून मान्सून माघार घेतो. यंदाही मान्सून ठरलेल्या वेळेतच परतणार असा सुरुवातीचा अंदाज होता; मात्र बदलत्या हवामानामुळे मान्सूनचा मुक्काम अधिक काळ लांबण्याचे स्पष्ट संकेत आहेत. दरम्यान, उत्तर प्रदेश आणि बिहारमधील काही भागात मुसळधार पावसासह वीज पडण्याचा धोका व्यक्त करण्यात आला असून, मध्य प्रदेशसाठी अतिवृष्टीचा इशारा जारी करण्यात आला आहे



गेल्या आठवड्यात देशातील अनेक भागांत पावसाने उघडीप दिली होती, तर काही ठिकाणी काही तास किंवा दिवसांच्या विश्रांतीनंतर पुन्हा पावसाने हजेरी लावली. ही स्थिती आजपासून बदलण्याची शक्यता आहे. १२ आणि १३ सप्टेंबर रोजी देशाच्या विविध भागांत पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज आहे. त्यानंतर १४ सप्टेंबरला पाऊस पुन्हा काही काळ विश्रांती घेईल आणि १५ सप्टेंबरपासून त्याचा जोर पुन्हा वाढू शकतो, असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे

मुंबई वेधशाळेने पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज जाहीर केला असून, राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यासह पाऊस आणि विजांच्या कडकडाटाची शक्यता वर्तवली आहे.

११ सप्टेंबर रोजी नाशिक घाट, परभणी, हिंगोली, नांदेड, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांना 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे. १२ सप्टेंबर रोजी धुळे, नाशिक घाट, नाशिक, पालघर, ठाणे, मुंबई, मुंबई उपनगर, रायगड, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, बुलढाणा, जालना, बीड, धाराशिव, सोलापूर, लातूर, परभणी, नांदेड, हिंगोली, वाशिम, अकोला, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये वादळी पाऊस व विजांची शक्यता आहे. १३ सप्टेंबर रोजी पालघर, ठाणे, मुंबई, मुंबई उपनगर, रायगड, पुणे घाट, पुणे, सातारा घाट, सातारा, रत्नागिरी, नाशिक, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, बुलढाणा, जालना, बीड, धाराशिव, परभणी, हिंगोली, वाशिम, अकोला, अमरावती, यवतमाळ आणि वर्धा या जिल्ह्यांना 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे.

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
ताम्हाणे हॉस्पिटल
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

पवित्र श्रावण मासारंभानिमित्त मंगलमय शुभेच्छा !
कॅमल सुपरफाईन शाबुदाणा
उपवास अनेक, शाबुदाणा मात्र फक्त कॅमलचाच
1 kg | 500gm | 250gm
सर्व किराणा दुकानांमध्ये उपलब्ध



# महावितरण कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनच्या प्रदेश कार्याध्यक्षपदी कपिल पवार यांची निवड



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शिर्डी लोकसभा जिल्हाध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते कपिल पवार यांची महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या (महावितरण) कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनच्या प्रदेश कार्याध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आहे. त्यांच्या या निवडीने संगमनेरसह शिर्डी लोकसभा मतदारसंघातील समर्थकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, विविध क्षेत्रांतील मान्यवर, पदाधिकारी, कार्यकर्ते व कंत्राटदारांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

कपिल पवार हे सामाजिक, राजकीय तसेच विविध विकासात्मक उपक्रमांमध्ये सातत्याने सक्रिय राहिले आहेत. 'सत्ता नव्हे, तर समाजकारण' या भूमिकेतून जनसामान्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देत त्यांनी विविध उपक्रमांमध्ये सहभाग घेतला आहे. जनतेच्या अडचणी समजून घेत त्या सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहिल्याने परिसरात त्यांची 'लोकांच्या मनातला माणूस' अशी ओळख निर्माण झाली आहे.

महावितरणच्या विविध कामांशी संबंधित कंत्राटदारांना प्रशासकीय अडचणी, कामकाजातील अडथळे, देयके, निविदा प्रक्रिया तसेच कामाच्या अंमलबजावणीदरम्यान अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागते. कंत्राटदार आणि महावितरण प्रशासन यांच्यात समन्वय साधून हे प्रश्न मार्गी लावण्यासाठी कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनची भूमिका महत्त्वाची ठरते. त्यामुळे प्रदेश कार्याध्यक्षपदाची जबाबदारी कपिल पवार यांच्यावर सोपविण्यात आल्याने कंत्राटदारांच्या प्रश्नांना आता राज्यस्तरावर अधिक प्रभावीपणे वाचा फुटण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

वीज वितरण व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी तसेच महावितरणची विविध कामे वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्यामध्ये कंत्राटदारांचे योगदान महत्त्वाचे आहे. या पार्श्वभूमीवर कंत्राटदारांना भेडसावणाऱ्या समस्या, प्रलंबित देयके, प्रशासकीय प्रक्रिया, कामाच्या अंमलबजावणीतील अडचणी आणि अन्य प्रश्नांबाबत संघटितपणे पाठपुरावा करण्याची मोठी जबाबदारी पवार यांच्या खांद्यावर आली आहे.

पवार यांच्या संघटनात्मक अनुभवाचा आणि सामाजिक कार्यातील सक्रियतेचा फायदा असोसिएशनला होईल, असा विश्वास त्यांच्या समर्थकांकडून व्यक्त होत आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली कंत्राटदारांच्या प्रश्नांना न्याय मिळण्याबरोबरच महावितरण प्रशासन आणि कंत्राटदार यांच्यातील समन्वय अधिक मजबूत होण्याची अपेक्षाही व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, प्रदेश कार्याध्यक्षपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल कपिल पवार यांचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते, मित्रपरिवार, सामाजिक संस्थांचे पदाधिकारी तसेच महावितरणशी संबंधित कंत्राटदारांनी अभिनंदन केले. नवीन जबाबदारीच्या माध्यमातून कंत्राटदारांच्या प्रश्नांना न्याय देत वीज वितरण क्षेत्रातील कामकाजाला अधिक गती मिळवून द्यावी, अशा शुभेच्छाही त्यांना देण्यात आल्या.

# कसारा, तळेगाव दिघे, मिर्झापूरच्या शाळांना ६२ लाखांचा निधी मंजूर - आ. अमोल खताळ

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - समग्र शिक्षा योजना सन २०२६-२७ अंतर्गत संगमनेर विधानसभा मतदारसंघातील कसारा दुमाला येथील सावंतवस्ती, तळेगाव दिघे येथील धनगरवाडी आणि मिर्झापूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये नवीन वर्गखोल्यांचे बांधकाम तसेच पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणासाठी ६२ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. अशी माहिती आमदार अमोल खताळ यांनी दिली.



आमदार खताळ यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार व सुरक्षित शैक्षणिक वातावरण मिळावे, यासाठी शाळांच्या भौतिक सुविधांमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. अनेक ठिकाणी विद्यार्थ्यांच्या संख्येच्या तुलनेत वर्गखोल्या अपुऱ्या असल्याने अध्यापनावर परिणाम होतो. ही बाब लक्षात घेऊन संबंधित शाळांमध्ये आवश्यक वर्गखोल्यांचे बांधकाम करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. कसारा दुमाला (सावंतवस्ती), तळेगाव दिघे (धनगरवाडी) आणि मिर्झापूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांना मंजूर झालेल्या या निधीमुळे विद्यार्थ्यांना अधिक प्रशस्त, सुरक्षित व शैक्षणिकदृष्ट्या पोषक वातावरण उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. नवीन वर्गखोल्यांमुळे नियमित अध्यापनासाठी आवश्यक जागा उपलब्ध होणार असून, शिक्षकांनाही अध्यापनाचे नियोजन अधिक प्रभावीपणे करता येणार आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरातील विद्यार्थ्यांप्रमाणेच उत्तम शैक्षणिक सुविधा मिळाव्यात, यासाठी शाळांच्या इमारती, वर्गखोल्या तसेच अन्य मूलभूत सुविधांकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. समग्र शिक्षा योजनेंतर्गत मिळालेल्या या निधीमुळे संबंधित गावांतील विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# बेकायदेशीर भंगार दुकानांवर पोलिसांचा दणका

## संशयास्पद १७ वाहने पोलिसांच्या रडारवर

## विनापरवाना वाहने तोडणाऱ्या दोघांवर गुन्हा



युवावार्ता (प्रतिनिधी)

श्रीरामपूर - शहर व परिसरातील वाहन चोरीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर बेकायदेशीर भंगार दुकानांवर श्रीरामपूर शहर पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. विनापरवाना वाहने भंगारासाठी तोडणे, तसेच वाहनांच्या मालकीबाबत आवश्यक कागदपत्रे सादर न केल्याप्रकरणी दोन भंगार दुकानदारांविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली आहे.

अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या आदेशानुसार ११ ऑगस्ट रोजी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत ऑलआऊट ऑपरेशन व कोंबिंग ऑपरेशन राबविण्यात आले. यावेळी शहरातील भंगार दुकानांची तपासणी करण्यात आली. गोपीनाथनगर परिसरातील तीन भंगार दुकानांमध्ये एकूण १७ वाहने आढळून आली. यामध्ये शकील इब्राहीम शहा यांच्या भंगार दुकानात आल्टो, स्विफ्ट, टाटा सुमो, टाटा मॅजिक, इंडिका यांसह १० वाहने; सुलेमान दादामिया शहा यांच्या दुकानात वॅगनर, आल्टो व ओमिनी अशी चार वाहने; तर आसिफ हारुण शहा यांच्या दुकानात पोलो, हुंडाई आय-२० व टाटा इंडिका अशी तीन वाहने आढळली.

पोलिसांनी संबंधितांकडे वाहनांची कागदपत्रे व मालकी हक्काबाबत खुलासा मागितला. आसिफ शहा यांनी समाधानकारक माहिती व कागदपत्रे सादर केली. मात्र, शकील शहा व सुलेमान शहा यांना त्यांच्या ताब्यातील वाहनांच्या मालकीबाबत कोणताही ठोस पुरावा सादर करता आला नाही. तपासात संबंधित वाहनांच्या मालकीबाबत आवश्यक पुरावे उपलब्ध नसल्याचे तसेच आरटीओची परवानगी न घेता वाहनांचे चेसिस व इंजिन क्रमांक जमा न करता वाहने स्क्रॅप करण्याचा प्रकार झाल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी शकील इब्राहीम शहा व सुलेमान दादामिया शहा यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम २२३, ३१८(४) व ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून दोघांना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

भंगार दुकानदारांना पोलिसांचे आवाहन

भंगार दुकानदारांनी जुन्या वाहनांची, इंजिन व चेसिस क्रमांकांची तसेच सुट्या भागांची नोंद रजिस्टरमध्ये ठेवावी. वाहन खरेदी करताना आरसी बुक, खरेदीखत व विक्रेत्याची ओळखपत्रे तपासल्याशिवाय व्यवहार करू नये. आरटीओच्या अधिकृत परवानगीशिवाय वाहन स्क्रॅप करू नये. विना नंबरचे अथवा संशयास्पद वाहन विक्रीस आणल्यास तत्काळ पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विशाल खैरे व श्रीरामपूर शहर पोलिसांच्या पथकाने केली.

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

पान ३ वरून

## पुणे-नाशिक रेल्वे...

मार्गासाठी आंदोलनाची भूमिका घेतली जात आहे. त्यामुळे राजकारणाच्या पलीकडे जाऊन सर्वांनी या प्रकल्पासाठी भूमिका घेणे गरजेचे आहे. नाशिक-पुणे सरळ रेल्वे मार्गामुळे गोल्डन ट्रँगल अधिक सक्षमपणे जोडला जाईल आणि या संपूर्ण विभागाच्या औद्योगिक, आर्थिक व सामाजिक विकासाला मोठी चालना मिळेल. पिढ्यान्पिढ्यांच्या भविष्यासाठी आणि या विभागाच्या समृद्धीसाठी नाशिक-पुणे सरळ रेल्वे मार्ग झाला पाहिजे. यासाठी सर्वांनी सातत्याने आग्रह धरून हा प्रकल्प मंजूर करून घेण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे आवाहन थोरात यांनी केले. दरम्यान, नाशिक-पुणे रेल्वे मार्ग रद्द करून शिर्डी-अहिल्यानगरमार्गे नवीन मार्ग नेण्याच्या घोषणेनंतर नाशिक, सिन्नर, संगमनेर, जुन्नर, नारायणगाव, खेड, मंचर यांसह उत्तर महाराष्ट्र आणि पुणे जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. विशेषतः तरुण वर्गातून या निर्णयाला तीव्र विरोध होत असून, सरळ नाशिक-पुणे रेल्वे मार्गासाठी आंदोलनाची भुमिका घेतली जात आहे.




सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का? काळजी करू नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
❊ कर्ज रक्कम वाढ । ❊ कर्ज व्याजदर कमी । ❊ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु॥, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
24HRS EMERGENCY SERVICES
Health Emergencies Don't Wait. Neither DO WE
24 तास सुविधांसाठी 02425 - 224761 मोबा. 7038170382
डॉ. जठार हॉस्पिटल
ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
KH
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25